सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २७ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३६० | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## भारतावर १० वर्षात २५० अब्ज डॉलर्सने वाढले विदेशी कर्ज

### ८ लाख ३९ हजार कोटींवर गेले महाराष्ट्रावरील कर्ज

नवी दिल्ली : भारतात गेल्या १० वर्षात विदेशी कर्ज २५० अब्ज डॉलर्सने वाढले आहे. लोकसभेत विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाचे उत्तर देताना केंद्रीय वित्त मंत्रालयामार्फत हे उत्तर देण्यात आले आहे. वित्त मंत्रालयाला एक प्रश्न विचारण्यात आला होता की, ३१ मार्च २०१४ रोजी भारतावर विदेशी कर्ज किती होते? ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत कर्ज किती वाढले आहे?

अर्थमंत्रालयाने मात्र सप्टेंबर २०२४ पर्यंतची आकडेवारी मांडली आहे. त्यानुसार देशावर ७११.८ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे विदेशी कर्ज आहे. मार्च २०१४ मध्ये ४४६.२ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकं विदेशी कर्ज होते. म्हणजेच गेल्या १० वर्षात भारतावरील विदेशी कर्ज २६५ अब्ज डॉलर्सने वाढले आहे.

वित्त मंत्रालयाने या उत्तरासोबत आणखी माहिती दिली. भारताने २०१३-१४ मध्ये विदेशी कर्जावर व्याज ११.२० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतके दिले होते. २०२३-२४ मध्ये अंदाजे २७.१० अब्ज डॉलर्स इतके व्याज दिले आहे.

महाराष्ट्राचे अर्थमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी राज्याचा अर्थसंकल्प मांडला. यामध्ये महाराष्ट्रावर किती कर्ज आहे याची माहिती दिली. महाराष्ट्रावरील कर्जाची रक्कम ९ लाख ३२ हजार कोटींवर जाईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचा अर्थसंकल्प मांडण्यात आला, तेव्हा वर्तवण्यात आलेल्या अंदाजापेक्षा अधिक कर्ज महाराष्ट्रावर झाले आहे. महाराष्ट्रावरील कर्ज ८ लाख ३९ हजार कोटींवर गेले आहे. केंद्र आणि आरबीआयने राज्य सरकारांनी किती कर्ज काढावे, याबाबतचे नियम निश्चित केले आहेत. त्यानुसार राज्याच्या उत्पन्नाच्या एकूण २५ टक्क्यांपर्यंत कर्ज काढता येते.

### ७ दिवसांच्या तेजीला ब्रेक; शेअर बाजार घसरला

## सेन्सेक्स ७२८ तर निफ्टी १८१ अंकांनी कोसळला, रिअल्टी आणि आयटी शेअर्समध्ये जोरदार विक्री

मुंबई : सलग सात दिवसांच्या वाढीनंतर आज शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सेन्सेक्स ७२८ अंकांनी घसरून ७७,२८८ वर बंद झाला, तर निफ्टी १८१ अंकांनी घसरून २३,४८६ वर बंद झाला. बँक निफ्टीतही मोठी घसरण झाली असून तो ३९८ अंकांनी घसरून ५१,२०९ वर बंद झाला. बाजारातील सर्वाधिक विक्री आयटी आणि रिअल्टी क्षेत्रात दिसून आली.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापार धोरणातील अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदारांनी नफा बुकिंगला प्राधान्य दिले. भारतीय कंपन्यांच्या मार्च तिमाही निकालांमध्ये काही कंपन्यांचे आर्थिक परिणाम कमकुवत राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळेही बाजार घसरण्याची शक्यता आहे. 'बाय चायना, सेल इंडिया' हा ट्रेंड पुन्हा सक्रिय होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. चीनी शेअर्सच्या तुलनेत भारतीय शेअर्स महाग झाले असून परदेशी गुंतवणूकदारांनी विक्रीचा मळवाट स्वीकारल्याने बाजारावर दबाव वाढला आहे.



### सर्वाधिक नुकसान कोणत्या क्षेत्रांना?

निफ्टी ऑटो इंडेक्स वगळता एनएसईवरील सर्व सेक्टोरल निर्देशांक लाल रंगात बंद झाले. निफ्टी पीएसयू बँक, आयटी, हेल्थकेअर आणि रिअल्टी निर्देशांक १% हून अधिक घसरले. विशेष म्हणजे, निफ्टी ऑटो निर्देशांकात मात्र केवळ 0.02% वाढ झाली. आजच्या घसरणीनंतर बाजारातील गुंतवणूकदारांची नजर आता उद्याच्या ट्रेंड आणि ग्लोबल मार्केटमधील हालचालींवर राहील.

अमेरिकन बाजारात फार्मा आणि आयटी क्षेत्रांमध्ये मोठी विक्री दिसून आली. इराणवर अमेरिकेच्या निर्बंधांमुळे आणि कच्च्या तेलाच्या साठ्यातील घटेमुळे तेलाच्या किमती वाढल्या आहेत. त्यामुळेही जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण झाली आहे.

निफ्टी ऑटो निर्देशांक वगळता एनएसईवरील सर्व क्षेत्रीय निर्देशांक लाल रंगात बंद झाले. निफ्टी पीएसयू बँक, आयटी, हेल्थकेअर आणि रिअल्टी निर्देशांकात एक टक्क्यांहून अधिक घसरण झाली. विशेष बाब म्हणजे निफ्टी ऑटो निर्देशांकात केवळ ०.०२ टक्क्यांची किरकोळ वाढ नोंदवली गेली.

**शेअर बाजार का घसरला?**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापार धोरणातील अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदारांनी नफा बुकिंगला प्राधान्य दिले.

भारतीय कंपन्यांच्या मार्च तिमाही निकालांबद्दलच्या अंदाजांमुळे बाजारावर दबाव दिसून आला. काही कंपन्यांचे निकाल ट४ऋ२५ मध्ये अपेक्षेपेक्षा कमजोर असतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

'बाय चायना, सेल इंडिया' ट्रेंड पुन्हा दिसू शकतो. चीनी शेअर्सच्या स्वस्त मूल्यांकनामुळे परदेशी गुंतवणूकदार भारतीय शेअर्सची विक्री करू शकतात.

अमेरिकन बाजारातील फार्मा आणि आयटी क्षेत्रांमध्ये मोठी विक्री दिसून आली.

इराणवर अमेरिकेचे नवीन निर्बंध आणि कच्च्या तेलाच्या साठ्यात घट होण्याच्या भीतीमुळे तेलाच्या किमतीत वाढ झाली, याचा परिणाम बाजारावर दिसून आला.

## विधान भवनात वीज पुरवठा खंडीत

मुंबई : महाराष्ट्राचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत सुरू आहे. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसाचे कामकाज सुरू असताना दुपारी काही सेकंदांसाठी विधान भवनाच्या इमारतीचा वीज पुरवठा खंडीत झाला. जनरेटर बॅकअप असल्यामुळे कामकाज ठप्प झाले नाही. पण दोन्ही सभागृहात दिवे चमकल्यामुळे वीज पुरवठ्याची समस्या निर्माण झाल्याचे काही जणांच्या लक्षात आले.

याआधी सकाळच्या सत्रात विधानसभेत उपाध्यक्षांची एकमताने निवड झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी एकमताने निवड झाली. विधानसभा उपाध्यक्ष पदासाठी महायुतीकडून आमदार अण्णा बनसोडे यांचा अर्ज सादर झाला होता. उपाध्यक्ष पदासाठी विरोधकांकडून एकही अर्ज आला नव्हता. यामुळे बनसोडे यांच्या निवडीची औपचारिकता उरली होती. बुधवारी २६ मार्च रोजी अण्णा बनसोडे यांची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी एकमताने निवड झाली आणि औपचारिक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. नंतर इतर विषयांतील कामकाज झाले.

शेवटच्या दिवशी विधानसभेत चर्चा सुरू असताना आमदार राम कदम यांनी दिशा सालियन आणि सुशांत सिंह राजपूत या प्रकरणात तत्कालीन उद्धव सरकारने अधिकारांचा गैरवापर करत पुरावे नष्ट केल्याचा आरोप केला. सत्तेत असताना उद्धव ठाकरेंचे समर्थक रिया चक्रवर्तीचे प्रवक्ते असल्यासारखे वागत बोलत होते, असाही आरोप आमदार राम कदम यांनी सभागृहात बोलताना केला. राम कदम यांनी आरोप करताच उद्धव समर्थकांनी सभागृहात नाराजी व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. पण राम कदम त्यांच्या वक्तव्यावर ठाम राहिले. उद्धव सरकारने पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला की नाही आणि केला असल्यास नेमकी काय कृती केली, याची सखोल चौकशी करण्याची मागणी आमदार राम कदम यांनी सरकारकडे केली. ही मागणी त्यांनी सभागृहात बोलताना केली.

## कैद्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र सुरू करा-जिल्हाधिकारी स्वामी

छत्रपती संभाजीनगर,दि.२६ - कारागृहातील कैद्यांना बंदिवासात कौशल्य प्रशिक्षण दिल्यास त्यांचे पुढील आयुष्यात पुनर्वसन करणे अधिक सुकर होईल. त्याकरीता जिल्हा कारागृहातील कैद्यांसाठी कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरु करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हा कौशल्य विकास आराखड्या संदर्भात या बैठकीत चर्चा झाली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, सहाय्यक आयुक्त सुरेश वराडे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, उद्योग निरीक्षक ए.एस. जरारे, कृषी विज्ञान केंद्राच्या डॉ.अनिता जिंतुरकर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपसंचालक पी.बी. दुर्गे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या जिल्हा समन्वयक सुचिता खोतकर, अटल इंक्युबेशन सेंटरचे संचालक वैभव खैरनार, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अभिजीत अल्टे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीवास्तव, तंत्रनिकेतन विद्यालयाचे खराळ, सीपेट प्रशिक्षण संस्थेच्या मौसम चौधरी, नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वयक संकल्प शुक्ला आदी उपस्थित होते.


जिल्हा कौशल्य विकास आराखड्यात कारागृहातील कैदी व दिव्यांग व्यक्ती यांच्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविण्यात आले. त्यात कारागृहातील कैद्यांना विविध उद्योगांसाठी आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण दिले जाईल. या प्रशिक्षणामुळे कैद्यांना रोजगार संधी उपलब्ध व्हाव्यात. प्रशिक्षणामुळे कैद्यांमध्ये सकारात्मक मानसिक बदल घडवून आणण्यास मदत होईल.

तुरुंगवासानंतर समाजात मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी मिळेल. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींसाठी देखील कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार आहे, ज्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन ते आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, अशी भुमिका जिल्हाधिकारी स्वामी यांनी मांडली. त्यानुसार कौशल्य व उद्योजकता विकास विभागाने प्रस्ताव सादर करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात यावा. दि.१ मे रोजी जिल्हा कारागृहात कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू होईल असे नियोजन करावे. जिल्ह्यातील नाविन्यपूर्ण उपक्रमात या उपक्रमाचा समावेश करावा.अधिक सकारात्मकतेने योगदान द्यावे असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले. जिल्ह्यातील विविध संस्था आणि विभागांच्या मदतीने हा उपक्रम राबविला जाणार आहे.

### कामरा आणि अंधारेंविरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल

मुंबई : स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक कविता सादर केली होती. तिच कविता, त्याच चालीत, ठाकरे गटाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी माध्यमांशी बोलताना बोलून दाखवली होती. याचे पडसाद आज विधानपरिषदेच्या सभागृहात उमटले. भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी कामरा आणि अंधारे यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल केला.

आमदार प्रविण दरेकर म्हणाले कि, हा एक प्रकारे सभागृहाचा किंबहुना सभागृहातील सगळ्या सदस्यांचा अवमान आहे. त्यांनी एकप्रकारे सभागृहातील सदस्यांना डिवचण्याचा प्रयत्न केलाय, ही बाब अत्यंत गंभीर आहे. हे सभागृह सर्वोच्च आहे आणि या सभागृहाचा अवमान आम्ही सहन करणार नाही. शिवसेना उबाठा गटाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी कामरा यांचा स्टुडिओ फोडल्याप्रकरणी यूट्यूब, सोशल मीडियाच्या माध्यमातून भाष्य करताना चुकीची भाषा वापरली होती. त्यांनी आपल्या निवेदनात संस्कृती आणि शाब्दिक मर्यादांचे उघडपणे उल्लंघन केलेय.




## पाणी चासकमानसाठी उपयुक्त - राधाकृष्ण विखे पाटील

मुंबई, दि. २५ : चासकमान प्रकल्पाच्या मंजुर बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणे कामाचे संकल्पन, सरेखा व अंदाजपत्रक इत्यादीचे काम प्रगतीपथावर आहे. संकल्पनाअंती आराखड्यास मंजुरीनंतर बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमुळे पाणी बचत होईल आणि हे अतिरिक्त पाणी चासकमानसाठी उपयोगी ठरेल, असा विश्वास जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधान परिषदेत व्यक्त केला. सदस्य प्रवीण दरेकर यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती.

याबाबत अधिक माहिती देताना जलसंपदा मंत्री श्री.विखे-पाटील म्हणाले, चासकमानसाठी कलमोडी धरणातून १.०७ टीएमसी पाणी आरक्षित आहे. लोकसंख्येच्या वाढीमुळे आणि औद्योगिक क्षेत्राच्या विस्तारामुळे पाण्याची मागणी वाढत आहे. कलमोडी मध्यम प्रकल्पाच्या फेर जल नियोजन प्रस्ताव महामंडळाकडून शासनास प्राप्त झाला असून प्रस्तावाची छाननी प्रक्रिया सुरू आहे. नवीन प्रकल्पाच्या अंमलबजावणीसह, जुन्या पाणीवितरण व्यवस्थेत सुधारणा करून, उपलब्ध पाण्याचा अधिक चांगला उपयोग करता येईल. यामुळे अतिरिक्त पाणी उपलब्ध होईल आणि भविष्यातील वाढती मागणी पूर्ण करता येईल, असेही श्री.विखे पाटील यांनी सांगितले.

### छत्तीसगडमध्ये १५ नक्षलवादी आले शरण

सुकमा : छत्तीसगडमध्ये सुरक्षा पथकांच्या कारवाईत मारले जाण्याच्या भीतीने नक्षलवादी शरण येऊ लागले आहेत. राज्यात एका दिवसात १५ नक्षलवादी शरण आले आहेत. यातील काही नक्षलवाद्यांवर बक्षिस लावण्यात आले होते. या बक्षिसाची एकूण रक्कम ३९ लाख रुपये एवढी आहे. केंद्र सरकारने ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद संपुष्टात आणण्यासाठी कठोर पवित्रा घेतला आहे. केंद्राने कठोर पवित्रा घेतल्यापासून शरण येत असलेल्या नक्षलवाद्यांच्या संख्येत वाढ होऊ लागली आहे.

## बाजरी, ज्वारी पिक कर्जाचे दरामध्ये एकरी तीस हजार वरुन रु. चाळीस हजार पर्यंत वाढ करण्याचा जिल्हा बँकेचा निर्णय : चेअरमन आ. शिवाजीराव कर्डिले

अहमदनगर : अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नेहमीच शेतकरी हिताचे निर्णय घेतले असुन बँकेच्या आज झालेल्या संचालक मंडळ सभेमध्ये सन २०२५-२६ करीता खरीप व रब्बी हंगामातील बाजरी व ज्वारी पिकासाठी पुर्वीचे रु.३००००/- एकरी कर्जदरात रु.१००००/- वाढ करुन या पिकांचे एकरी कर्जदर रु.४००००/-करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती बँकेचे चेअरमन आ.श्री. शिवाजीराव कर्डिले यांनी दिली

बँकेमार्फत आज अखेर अल्पमुदत पीककर्जा करिता २४२१ कोटींचे कर्ज वाटप केलेले आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी त्यांचेकडील दि.३१ मार्च २०२५ अखेर असलेल्या वसुलास पात्र पिक कर्ज रकमेचा वेळेत भरणा करुन शासनाच्या व्याज परतावा धोरणाचा फायदा घेवुन रु.३ लाखापर्यंतच्या पिक कर्जास शुन्य टक्के व्याजदराचा फायदा घ्यावा व बँकेचे नवीन वाढीव कर्जदाराचा लाभ घ्यावा तसेच थकबाकीदार शेतक-यांनी कर्ज भरल्यास त्यांना बँक त्वरीत पिक कर्ज देईल त्यामुळे कर्जदार शेतक-यांनी आपले कर्ज ३१ मार्च २०२५ पुर्वी बँकेत भरणा करण्याचे आवाहन चेअरमन कर्डिले यांनी केले. यासाठी बँक शेतकरी कर्जदारांचे कर्ज भरण्याकरीता दिनांक २९, ३० व ३१ मार्च २०२५ रोजी चालू राहणार असल्याची हि माहिती चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांनी दिली.

## छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात अनधिकृत भूखंड, बांधकाम नियमित होणार : दिलीप गावडे

### सर्वेक्षण पथकास सहकार्य करण्याबाबत महानगर आयुक्तांच्या तहसीलदार, गटविकास अधिकारी यांना सूचना

छत्रपती संभाजीनगर,दि.२६, :- छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात अनाधिकृत भूखंड तसेच बांधकामाबाबत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मदतीने सर्वेक्षण करण्यात येणार आहे. महानगर क्षेत्रात सर्वेक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी यापूर्वी केले होते आता तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच संबंधित अधिकारी तसेच कर्मचारी यांनी सर्वेक्षण पथकास आवश्यक सहकार्य करण्याबाबत सूचना आज दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालयात आज छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील विना परवानगी भूखंड तसेच बांधकाम सर्वेक्षणाबाबत श्री. गावडे यांनी आज प्राधिकरण क्षेत्रातील तहसीलदार, गटविकास



अधिकारी, उप अधीक्षक भूमी अभिलेख, दुय्यम निबंधक, गुंठेवारी कक्ष प्रमुख (म.न.पा.), व सबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधला, यावेळी महानगर नियोजनकार हर्षल बावीस्कर, सह महानगर नियोजनकार रविंद्र जायभाये, अनधिकृत बांधकाम विभाग प्रमुख सुनंदा पारवे, उप महानगर नियोजनकार यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

महानगर आयुक्त श्री.गावडे म्हणाले, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात अनाधिकृत भूखंड व विनापरवाना बांधकामाबाबत सर्वे क्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या अनुषंगाने महसूल विभाग तसेच पंचायत विभागाने नागरिकांमध्ये जनजागृतीच्या अनुषंगाने लोकसंपर्कातील संबंधीत कर्मचारी जसे की तलाठी, ग्रामसेवक यांना सूचना देण्याबाबत सांगितले. तसेच सर्वे क्षण करताना आवश्यक कागदपत्रे सर्वेक्षकांना पुरविण्यात यावे, असे निर्देश दिले.

प्राधिकरण क्षेत्रामध्ये गुंठेवारी नियमांतर्गत छोट्या क्षेत्राचे भूखंड तसेच बांधकामे नियमित करण्याच्या अनुषंगाने संबंधित भूमी अभिलेख विभागाने मोजणी करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त श्री गावडे यांनी दिल्या आहेत. मोठ्या क्षेत्राच्या भूखंडामध्ये विनापरवावगी बांधकामे असल्यास त्याचे नियमितीकरण करण्याची प्रक्रिया सुरू असल्याने त्याबाबतची मोजणी करण्याच्या सूचनही त्यांनी दिल्या.

निबंधक कार्यालयांनी लोकहितास्तव आवश्यक त्या परवानग्या पाहून दस्ताच्या कार्यवाहीबाबत आवश्यक निर्णय घेण्याबाबत त्यांनी निर्देश दिले.

अनधिकृत भूखंड तसेच बांधकाम नियमित झाले तर गरजूंना या मालमत्तेवर बँकेकडून कर्ज मिळणेही सुलभ होणार आहे. तसेच ज्यांना सदर मालमत्तेची विक्री करावयाची असल्यास विक्री करणेही सुलभ होईल. तसेच नियमित झालेल्या मालमत्तांचे मुल्यामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने याबाबत जनजागृती करण्याबाबत महानगर आयुक्त श्री. गावडे यांनी सांगितले आहे.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २६ मार्च, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ९ एप्रिल, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही.

तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### पालिकेच्या उपायुक्तपदी केंद्रे रुजू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** महानगरपालिकेत उपायुक्त म्हणून कैलास रमेश केंद्रे हे रुजू झाले. मंगळवारी (दि.२५) त्यांनी पदभार स्वीकारला.



मूळचे जळकोट तालुक्यातील बोरगाव येथील रहिवासी रमेश केंद्रे यांची २०१५ मध्ये शासकीय सेवेत नियुक्ती झाली. यापूर्वी त्यांनी माढा नगरपंचायत येथे अडीच वर्षे काम केले. त्यानंतर सांगोला नगरपरिषदेत साडेतीन वर्षे कार्यभार सांभाळला.

मागील अडीच वर्षांपासून ते आळंदी येथे मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होते. आळंदी येथून पदोन्नती झाल्याने त्यांची लातूर महानगरपालिकेत उपायुक्तपदी पदस्थापना झाली आहे. मंगळवारी केंद्रे यांनी पदभार स्वीकारला. आयुक्त बाबासाहेब मनोहरे व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

### दयानंद विधी महाविद्यालयात अभिरूप न्यायालय स्पर्धेचा समारोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** दयानंद विधी महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील अभिरूप न्यायालय स्पर्धा पार पडली. या स्पर्धेस प्रतिसाद मिळाला.

स्पर्धेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे, अॅड. अनिकेत उज्ज्वल निकम यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी न्यायमूर्ती डिगे यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे महत्त्व आणि वकिलाची भूमिका समजावून सांगितली. या स्पर्धेच्या समारोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून क्रिमिनल लॉयर अॅड. अनिकेत निकम उपस्थित होते. वकील म्हणून वावरत असताना आपण आपल्या पध्दतीने या समाजाला आणखीन कसे सुदृढ करू शकू हा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव अॅड. श्रीकांत उटगे आणि प्रभारी प्राचार्य डॉ. पूनम नाथानी यांची उपस्थिती होती.

### लातूर व्यापारी धर्मशाळा करणार तिरळेपणावरील शस्त्रक्रियेस मदत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** व्यापारी धर्मशाळाद्वारा मिरागि नेत्रालयाला २५ तिरळेपणा, मोतीबिंदू व डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक सहकार्य करणार असल्याची माहिती नँब, लातूरचे अध्यक्ष डॉ. विजय राठी यांनी दिली आहे. लातूर व्यापारी धर्मशाळाद्वारा सामाजिक बांधिलकी म्हणून काही कार्यक्षेत्रातील सेवाभावी संस्थांना आर्थिक सहकार्य करण्याच्या भावनेतून नँब संचलित मिरागी नेत्रालयासाठी आर्थिक सहकार्य करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

मिरागी नेत्रालय ही संस्था डोळ्यांच्या सर्व उपचारासाठी अविरत सेवा करीत आहे. अनेक मोफत शिबिर व शस्त्रक्रिया मिरागीने केल्या आहेत. खासकरून मुलांचे तिरळेपणाचे ऑपरेशन, मोतीबिंदू व अनेक डोळ्याच्या शस्त्रक्रिया एक तर मोफत किंवा अतिशय अल्प दरात केल्या जातात. या सर्वांची दखल घेऊन लातूर व्यापारी धर्मशाळा ह्या संस्थेने संस्थेस २५ ऑपरेशन करण्यासाठी आर्थिक सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. याचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, फोटो व दारिद्र्यरेषेखालील सर्टिफिकेट असणे गरजेचे आहे.

### भरपाई देण्याची व्यापाऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** यशवंतराव चव्हाण कॉम्प्लेक्स खुले करण्यात यावे, या मागणीसाठी यशवंतराव व्यापारी संकुल असोसिएशनने मंगळवारी आक्रमक भूमिका घेत मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच तहसीलदारांची भेट घेऊन न्यायालयात धाव घेण्याचा इशारा दिला होता. कॉम्प्लेक्समधील सर्व व्यापारी एकत्र आले होते. असोसिएशनचे अध्यक्ष मनोज सूर्यवंशी, अॅड. रविकिरण गिरी, अॅड. निखिल मुंजाने, मुकेश रांदड, रामदास भोसले, विठ्ठल बेंबडे, अरुण बिराजदार, गोपी तापडिया, विजय जगदाळे, सुनील शेळके, व्यंकट माने, नागनाथ कोळी, व्ही.पी. पाटील, के.के. शिंदे, एजाज मणियार, सुधीर देवकते, विजयकुमार डागा आदींनी व्यापारी संकुल खुले करण्याची मागणी केली.

## अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेत बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांच्या उपस्थितीत मंगळवारी महानगरपालिकेत बैठक घेण्यात आली. यावेळी लोखंडे यांनी मनपाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेत समाधान व्यक्त केले.



या बैठकीस मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव,उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, मुख्य लेखा परीक्षक कांचन तावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना लोखंडे यांनी लाडपागे कमिटीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती देण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. वारसांची कागदपत्र हस्तगत करण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करून एक महिन्यात सर्व प्रकरणे निकाली काढावी असे निर्देश दिले.मनपाकडे कार्यरत असणाऱ्या सर्व सफाई कामगारांची वेळोवेळी आरोग्य तपासणी केली जावी. त्यासाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे.सफाई कामगारांच्या सुरक्षिततेसाठी हॅन्ड ग्लोव्हज, गम बूट, मास्क, टोपी या सुरक्षा साधनांचा पुरवठा करावा. शहरातील सर्व रुग्णालयांना बायो मेडिकल वेस्ट स्वतंत्रपणे संकलित करण्यास सांगावे. सफाई कामगारांची मुले शाळेत जातात का? याची तपासणी करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या. यावेळी बोलताना लोखंडे यांनी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या रमाई घरकुल योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यास सांगितले. या योजनेचा संबंधितांना लाभ मिळवून द्यावा. दलित वस्ती योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या निधीतुन गुणवत्तापूर्ण व्हावी,अशी अपेक्षाही लोखंडे यांनी व्यक्त केली. प्रारंभी आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी लोखंडे यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शासनाच्या सर्व योजनांची लातूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात असल्याचेही मनोहरे यांनी लोखंडे यांना अवगत केले. या बैठकीस सर्व सहाय्यक आयुक्त आणि अधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती.

## 'शाहू' मध्ये परिसंवाद संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** भारत देश हा प्राचीन सांस्कृतिक परंपरेसाठी प्रसिद्ध आहे . येथील 'ताज महाल' हे जगाच्या आश्चर्यातील एक आहे. मराठवाड्यातील वेरूळ, अजंठा येथील लेण्या देशात नव्हे तर जगात प्रसिद्ध झाली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले गड किल्ले आरमार यावरून ते केवळ लढवय्येच नव्हते तर ते आरमार तज्ज्ञ, कला व स्थापत्यशास्त्रज्ञ, वास्तुशास्त्रज्ञ होते. असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ सोमनाथ रोडे यांनी केले. ते राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या 'शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे, राजर्षी शाहू महाविद्यालय आणि भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमानेप्राचीन व मध्ययुगीन भारतीय लेणी कला व स्थापत्य यांचा सामाजिक प्रभाव या परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

अध्यक्षस्थानी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील होते. मंचावर भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेचे माजी वरिष्ठ सल्लागार डॉ. अरुणचंद्र पाठक, सहसचिव इंजि. गोपाळ शिंदे, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, इतिहास विभागप्रमुख डॉ. अर्चना टाक यांची उपस्थिती होती. डॉ. सोमनाथ रोडे पुढे म्हणाले की, समाज जीवनावर स्थापत्य कलेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात होताना दिसतो आहे. तसेच नव संशोधकांने असे मत त्यांनी मांडले. ऐतिहासिक कागदपत्रे आदीवर संशोधन करावे. अध्यक्षीय समारोप प्रसंगी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव पाटील म्हणाले की, इतिहास तज्ज्ञांनी पूर्वगृहदुषित इतिहासाचे पुनर्लेखन त्याची नव्याने मांडणी करावी की जेणेकरून सत्य समोर येऊन समाजाचे प्रबोधन होईल असा आशावाद या प्रसंगी व्यक्त केला.

स्वागत पर मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांनी महाविद्यालयाचा गुणात्मक वाढीचा चढता आलेख प्रस्तुत करून हे महाविद्यालय केवळ डॉक्टर, इंजिनिअरच बनविणारेच नसून ते सीए, प्रशासन सेवेतील अधिकारी निर्माण करणारे हे महाविद्यालय आहे. विद्यार्थ्यांसाठी त्याच्या सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने वेगवेगळे उपक्रम घेतले जातात ७ पदवीचे, १४ पदव्युत्तरचे ,११ संशोधन सेंटर तर २२ स्किल बेस सर्टिफिकेट कोर्स या महाविद्यालयात राबविले जातात म्हणाले. एन. एस. एस, एन. सी. सी, क्रीडा विभागाचे देशपातळीवर प्रतिनिधित्व करत आहेत.

तसेच महाविद्यालयालात विविध स्तरावर पुरस्काराने गौरविले आहे या गुणात्मक वाढीमुळेच पीएम उषा योजने अंतर्गत महाविद्यालयाला पाच कोटीचे अनुदान प्राप्त झाले आहे. असा महाविदयालयाचा चढता आलेख प्रभावी भाषेत सांगितला. या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. ओमप्रकाश शहापूरकर यांच्यासह इतरांनी केले.

## 'ते' संकुल खुले करण्याची तहसील प्रशासनावर नामुष्की



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** तहसील प्रशासनाने बेकायदेशिररित्या सोमवारी टाळे ठोकलेले यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल अखेर यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल असोसिएशनच्या आक्रमक पाठपुराव्यामुळे मंगळवारी खुले करण्याची नामुष्की तहसील प्रशासनावर आली.

सोमवारी सकाळी आठ वाजता गाळेधारकांना कसलीही पूर्वकल्पना न देता तहसीलदारांनी यशवंतराव चव्हाण संकुलच्या सर्व गाळ्यांना टाळे ठोकले होते. महसूल विभागाचे महापालिकेकडून दोन कोटींपेक्षा अधिक रुपये अकृषी कर येणे आहे. वारंवार पत्र देऊन पालिका त्याचा भरणा करत नाही. त्यामुळे पालिकेच्या मालमत्तांना टाळे ठोकण्याचा आम्हाला अधिकार आहे, असे तहसीलदारांचे म्हणणे होते. सोमवारी सकाळी ११ वाजता या संकुलातील सर्व गाळेधारक एकत्र आले. त्यांनी पालिका आयुक्तांची भेट घेतली. तहसील कार्यालयाने लावलेला कर हा अवाजवी आहे आणि कार्यवाही तहसील कार्यालयाने केली आहे. तेव्हा आपण तहसीलच्या अधिकाऱ्यांना बोलावे, असे सांगून आयुक्तांनी जबाबदारी झटकली.

यानंतर गाळेधारकांनी तहसीलदार सौदागर तांदळे यांची भेट घेतली. आम्ही केलेली कारवाई योग्य असून आम्ही लावलेला कर हा नियमानुसारच लावला आहे. जानेवारीपासून आम्ही पालिकेला पत्रव्यवहार करत आहोत. जोपर्यंत पालिका कर भरत नाही, तोपर्यंत आम्ही टाळे काढणार नाही, अशी भूमिका तहसीलदारांनी घेतली. एक तर तुम्ही आम्हाला नोटीस न देता आमच्या गाळ्यांना टाळे ठोकले. तुम्ही न्याय दंडाधिकारी असून आमच्या सोबत अन्याय केला आहे. पालिका तुमचे देणे आहे तर तुम्ही पालिकेला टाळे ठोकायला पाहिजे, आम्ही पालिकेचे सर्व कर वेळच्यावेळी भरणा केला आहे, असे गाळेधारकांनी सांगितले. दरम्यान, गाळेधारकांनी जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची भेट घेतली व सर्व कायदेशीर बाबी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. आमचे आर्थिक नुकसान झाले आहे.

त्याची भरपाई आपणास करून द्यावी लागेल, आपल्या कार्यवाहीच्या विरोधात न्यायालयात दाद मागू, असे निवेदनही दिले. गाळेधारकांच्या मागणीचा विचार करून उपविभागीय अधिकाऱ्यांनी मंगळवारी दुपारी तहसीलदारांना पत्र दिले. त्या पत्राच्या अनुषंगाने तहसीलदारांनी सदर संकुलाचे टाळे काढण्याचे लेखी आदेश दिले. यानंतर संकुलातील गाळ्यांचे टाळे काढण्यात आले.

## पैशाचे कारण; दांड्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** पैशाच्या कारणावरून एकाला दांड्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना लातुरात सोमवारी घडली. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी सुलतान अली कुरेशी यांना इम्रान इलीआज कुरेशी योन ऑटोचे आणि इतर पैसे घेण्याच्या कारणावरून शिवीगाळ करून दांड्याने मारहाण केली.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामूहिक आत्मदहनाचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयातील पदांबाबत राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद न केल्याच्या निषेधार्थ लातूर जिल्ह्यातील खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक समन्वय संघाच्यावतीने मंगळवारी (दि.२५) दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून सामूहिक आत्मदहनाचा प्रयत्न करण्यात आला. तसेच जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.



शिक्षक समन्वय संघाने महाएल्गार आंदोलन केल्यामुळे शासन निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ५२ हजार पदांना नागपूरच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात निधीची तरतूद होणे अपेक्षित होते. परंतु, निधीची तरतूद करण्यात आली नाही. समाज घडवणाऱ्या शिक्षकांना 'चला पुढे जाऊया' या संकल्पनेतून २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात तरतूद होणे अपेक्षित होते.

शिक्षकांची अपेक्षा पूर्ण न झाल्याने शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्यातूनच बीड जिल्ह्यातील धनंजय नागरगोजे या शिक्षकाने आत्महत्या केली. शिवाय, नैराश्येतून इतर चार शिक्षकांचा मृत्यू झाला. शासन ५२ हजार शिक्षकांची फसवणूक करीत आहे. त्यामुळे आमच्यासमोर मृत्यूशिवाय पर्याय नाही, असे सांगत जिल्हाधिकारी कार्यालसमोर निदर्शने करून आत्मदहनाचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने अनर्थ टळला.

या आंदोलनात जिल्हा शिक्षक समन्वय संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. नितीन सेलूकर, गिरीधर तेलंगे, बलभीम जगताप, बळवंत शिंदे, गंगाधर डिगोळे, सुवर्णा हलकुडे, सुनंदा पाटील, कमल काळजापुरे, शीतल रोकडे, कोमल डोणगावे आदी शिक्षक सहभागी होते.

## माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांची भाजपत घरवापसी?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** लातूरचे भाजपचे माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांनी लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर भाजपच्या स्थानिक नेत्यांवर आरोप करीत नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान कॉंग्रेस पक्षात प्रवेश करत भाजपच्या नेत्यांवर शरसंधान साधले होते.

दरम्यान, गेल्या चार दिवसांपूर्वी त्यांनी फेसबुक प्रोफाईलवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतचा कमळ असलेला फोटो शेअर केला आहे. याबाबत त्यांच्याशी संपर्क साधला असता, आपण कॉंग्रेस पक्षाला 'रामराम' केल्याची प्रतिक्रिया दिली आहे. मात्र, भाजप प्रवेशाबाबत त्यांनी 'वेट अॅण्ड वॉच'ची भूमिका घेतली असली तरी ते लवकरच भाजपत घरवापसी करणार असल्याची चर्चा सुरू आहे.



सुधाकर श्रृंगारे यांना राजकारणाचा गंध नव्हता. ते एक प्रसिध्द उद्योजक म्हणून ओळखले जात होते. २०१७ ला ते भाजपकडून चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ जिल्हा परिषद गटातून विजयी झाले. यानंतर त्यांनी खऱ्या अर्थाने राजकारणात प्रवेश केला. २०१९ ला भाजपने तत्कालीन खासदार डॉ. सुनील गायकवाड यांची उमेदवारी कापत सुधाकर श्रृंगारे यांना लोकसभेची उमेदवारी दिली होती. त्यांनी पावणेतीन लाखांपेक्षा अधिक मताधिक्याने विजय मिळवला. २०१९ ते २०२४ या कालावधीत त्यांचा पाच वर्षांचा कारभार चांगला गाजला. दरम्यान, श्रृंगारे यांच्या कारभारावर भाजपमध्ये अंतर्गत नाराजी वाढली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने पुन्हा श्रृंगारे यांना उमेदवारी दिली. मात्र, कॉंग्रेसचे डॉ. शिवाजी काळगे यांच्याकडून त्यांना दारुण पराभव पत्करावा लागला. हा पराभव श्रृंगारे यांच्या एवढा जिव्हारी लागला की, त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला व मतदारसंघातील विविध ठिकाणी जाऊन त्यांनी प्रचार सभेत भाजपवर सडकून टीका केली. मात्र, याचा कसलाही परिणाम विधानसभा निवडणुकीत झाला नाही. लातूर शहर मतदारसंघ वगळता सर्व ठिकाणी कॉंग्रेसला अपयश आले. विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळाल्यानंतर महायुती भक्कम झाली. केंद्रात व राज्यात दोन्ही ठिकाणी महायुतीचे सरकार आले. त्यामुळे श्रृंगारे यांना आपली चूक कळली असावी. त्यामुळेच त्यांनी आपण कॉंग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिली असल्याचे सांगितले आहे. पुढे आपण काय करणार यासंबंधी त्यांनी अद्याप सुतोवाच केलेले नाही. लवकरच आपल्याला कळेल, अशा शब्दांत त्यांनी प्रतिक्रिया दिली. त्यांनी चार दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतचा कमळ असलेला फोटो फेसबुक प्रोफाईलवर शेअर केल्याने श्रृंगारे हे लवकरच भाजपत घरवापसी करतील अशी चर्चा सुरू झाली आहे.

## शिक्षणमंत्री भुसे यांच्याशी शैक्षणिक संवाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, अजितसिंह पाटील यांनी मुंबई येथे राज्याचे शैक्षणिक मंत्री भुसे यांची सदिच्छा भेट घेउन नवे शैक्षणिक धोरण, शिक्षक क्षमतावृध्दी प्रशिक्षण, पायाभुत साक्षरता व संख्याज्ञान एफ एल एन), पहिली पासुन सीबीएसई पॅटर्न व कॉफीमुक्त परिक्षा अभियान या शासन उपक्रमाबददल चर्चात्मक संवाद साधुन शासनाचे अभिनंदन केले.

राज्यात नव्या शैक्षणिक धोरणाची पायाभरणी होत असताना जेएसपीएमने मागील काही वर्षापासुन आपल्या संस्थेतील विविध विद्याशाखा मधुन पायाभुत साक्षरता आदी विषयी या भेटी संवाद झाला.

## ग्रामदैवत श्री सिध्देश्वरास देवस्थानतर्फे मेघडंबरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -** लातूरचे श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थान केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाड्यासह कर्नाटक राज्यातही प्रसिध्द आहे. लातूरचे ग्रामदैवत म्हणून या देवस्थानची ओळख आहे.

या देवस्थानचे दर्शन घेण्यासाठी वर्षभर भाविकांची गर्दी असते. विशेषत: सोमवारी तर भाविक मोठ्या संख्येने येतात. देवस्थानतर्फे या मंदिराचे रूप बदलण्याचे काम सुरू असून याचे पारंपारिक स्वरूप जतन करण्याचा प्रयत्न होत आहे. याचाच एक भाग म्हणून देवस्थानतर्फे श्री सिध्देश्वराच्या मुख्य गाभाऱ्यात मेघडंबरी सिंहासन प्रस्थापित करण्यात आले आहे. यामुळे श्री सिध्देश्वरांचे विलोभनिय दर्शन भाविकांना होऊ लागले आहे.



लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानतर्फे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या देवस्थानचा उल्लेख अनेक पुराण व ग्रंथांमध्ये आहे. त्यामुळे हे देवस्थान प्राचीन असल्याचे सांगितले जाते. या देवस्थानाचे मंदिरही भव्य आणि सुरेख आहे. त्याचे मूळ स्वरूप जतन करण्याचे काम देवस्थानतर्फे गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. देवस्थानच्या लगतच असलेल्या कुंडासही मूळ स्वरूप देण्याचे काम पुरातत्व विभागातर्फे करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून देवस्थानच्यावतीने ग्रामदैवत श्री सिध्देश्वराच्या गाभाऱ्यात मेघडंबरी सिंहासन प्रस्थापित करण्यात आले आहे. कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यात असलेल्या कुमठा येथील वासुदेव श्यामबा यांच्या कलेतून ही मेघडंबरी साकारली आहे. सोमवारी ही मेघडंबरी ग्रामदैवत श्री सिध्देश्वराला अर्पण करण्यात आली आहे. या मेघडंबरीमुळे ग्रामदैवताचे विलोभनिय आणि देखण्या रुपाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.




# साठ भूमिहीन लाभार्थ्यांना सोडत पध्दतीने जमिनी वाटप

## उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या हस्ते सोडत

तभा वृत्तसेवा


कन्नड:- दि.२६ मार्च - तालुक्यातील तब्बल साठ भूमिहीन लाभार्थ्यांना सोडत पद्धतीने उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या हस्ते जमिनीचे वाटप दि.२६ रोजी करण्यात आले



कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजने अंतर्गत कन्नड तालुक्यातील ६० लाभार्थ्यांना उपविभागीय अधिकारी यांच्या हस्ते यांच्या दालनात सोडत पध्दतीने एकुण ९१ हे ०१ आर (२१२ एकर २६ गुंठे) जमीन वाटप करण्यात आली. सदरील जमीन ही अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रेषेखालील भुमिहिन कुटूंबाना १०० टक्के अनुदानावर देण्यात येते. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रेषेखालील भुमिहिन कुटूंब सन २०२१-२०२२ पासुन लाभ मिळण्याच्या प्रतिक्षेत होते. सदरील जमीन समाज कल्याण विभागाने सन २०२२-२३, २०२३-२४ व चालु वर्षात खरेदी करुन लाभार्थ्यांना लाभ मिळण्याच्या दृष्टीने उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी पुढाकार घेतला.

दि.२६. रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील दालनात उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसिलदार विद्याचरण कडवकर, नायब तहसिलदार प्रशांत काळे, तालुका कृषी अधिकारी संदीप सिरसाठ, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक श्रीमती सीमा सिंदीकर यांच्या उपस्थितीत नीदा नवीद खान वय ५ वर्ष या मुलीच्या हस्ते सोडत पध्दतीने चिठ्या काढुन माळेगांव लोखंडी, माळेगांव ठोकळ, वासडी, पळशी बु, नादरपुर व गौरपिंपरी या ठिकाणच्या जमीनी प्रति लाभार्थी चार एकर (कोरडवाहु) प्रमाणे निवड करण्यात आली. सदरील ६० लाभार्थ्यांच्या आदेशासाठी जिल्हाधिकारी अध्यक्ष जिल्हास्तरीय समितीकडे अंतीम मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये सदरील लाभार्थ्यांना सातबारा उतारा मिळेल. यावेळी महसुल सहाय्यक जीवन चव्हाण, समन्वयक अभिजित पानट, मंडळ अधिकारी विकास वाघ, तलाठी संगीता सुर्यवंशी, तलाठी एस ए बावस्कर, शिरस्तेदार आनंद शिंदे, तलाठी एस डी विसपुते, ग्राम विकास अधिकारी के एस थोरात, ग्रामसेवक एस एस गोसावी,सह लाभार्थी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (७६) श्रद्धा५

शारदापीठाच्या शंकराचार्यांचा देहांत झाला; तेव्हा द्वारका पिठाचे शंकराचार्य श्री अभिनव सच्चिदानंदजींनी गुरुजींना विनंती संदेश पाठवला. पूज्य गुरुजी आता आपण स्वतः शंकराचार्यांचे स्थान ग्रहण करावे. आपणच जगद्गुरुच्या स्थानाला सन्मानित करावे. परंतु गुरुजींनी त्यांना नम्रतापूर्वक संदेश पाठवला की- जगदुरु आपली आज्ञा शिरोधार्य आहे पण या कार्याच्या आधीच मी एका महान कार्याचा स्वीकार केला आहे. रा.स्व.संघ म्हणजे सामान्य शक्तीचे असामान्य गठबंधन आहे. संघ राष्ट्रउपासक आहे; हे मला डॉक्टरजींनी समजावून सांगितले व माझे गुरु स्वामी अखंडानंदजींनी तू हेच काम कर यासाठी आशीर्वाद दिला आहे. म्हणूनच मी आता माझ्या व्यक्तिगत मोक्षासाठी साधना न करता मै नही तू ही हे ध्येय अंगीकारले आहे. या तू साठी म्हणजे संघ- समाज - ईश्वरासाठी साधना करणार आहे.

जगतजननी माँभारतीची सेवा करणे हीच माझी आकांक्षा आहे; हीच माझी श्रद्धा आहे. त्यावर द्वारका पिठाच्या शंकराचार्यांनी तथास्तु म्हणून आशीर्वाद दिला. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## पॅरीमॅचवर विनिंग फेस्टिव्हल आला आहे परत

पुणे : वर्षातील सर्वात मोठा क्रिकेट कार्यक्रम, इंडियन टी२० लीग, नुकताच सुरू झाला आहे आणि पॅरीमॅच जगभरातील चाहत्यांसह या उत्सवात सामील होत आहे. सलग तिसऱ्या वर्षी, पॅरीमॅच त्यांच्या सिग्नेचर फेस्टिव्हल ऑफ विनिंग्ज ग्रँड टूर्नामेंटसह हा प्रसंग साजरा करत आहे. या वर्षी, हे नेहमीपेक्षा मोठे आहे, नेत्रदीपक उत्सव, विशेष ऑफर आणि उदार बक्षिसे यामुळे हा क्रिकेट हंगाम खरोखरच अविस्मरणीय बनेल! विनिंग फेस्टिव्हल ग्रँड स्पर्धेत दर आठवड्याला मोठा विजय मिळवा.या भव्य स्पर्धेत, नेत्रदीपक विजयांचा उत्सव, एकूण ५.८ कोटी रुपयांची बक्षिसे आहेत, ज्यात दोन हाय-स्पीड पोर्श केयेन्सचा समावेश आहे. हे २२ मार्च ते २५ मे २०२५ पर्यंत चालेल आणि त्याचे २ फेऱ्या असतील. या स्पर्धेत सामील होण्यासाठी, तुम्हाला फक्त पॅरीमॅचमध्ये लॉग इन करावे लागेल, लॉयल्टी हबमधील टूर्नामेंटमध्ये सामील व्हा बटण दाबावे लागेल आणि १० च्या किमान स्टेकसह इंडियन टी२० लीगवर किमान एक भाकित करावे लागेल.

# सिल्लोड येथे आ.अब्दुल सत्तार मित्र मंडळाच्या वतीने रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१३, सिल्लोड येथे तालुका शिवसेना, युवासेना तसेच आ.अब्दुल सत्तार मित्र मंडळाच्या वतीने शहरातील सेना भवन मैदान परिसरात रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. या इफ्तार पार्टीत सर्वधर्मीय नागरिक उपस्थित असल्याने येथे एकात्मता व सामाजिक सलोखाचे दर्शन पहायला मिळाले.



यावेळी आ. अब्दुल सत्तार यांनी उपस्थितांशी संवाद साधला. विचारांची देवाण घेवाण सह सामाजिक एकतेचा संदेश रोजा इफ्तार पार्टीतून मिळतो. आपण सर्व एक आहोत ही भावना रोजा इफ्तार पार्टीतून वृद्धिंगत होत असल्याचे आ. अब्दुल सत्तार म्हणाले. यावेळी जिल्हा बँकेचे चेअर अर्जुन पा. गाढे, कृउबा समितीचे सभापती केशवराव पा. तायडे उपसभापती दारासिंग चव्हाण, माजी जि. प. सभापती किशोर बलांडे, शिवसेनेचे पदाधिकारी उपजिल्हाप्रमुख देविदास पा. लोखंडे, किशोर अग्रवाल, सुदर्शन अग्रवाल, मारोती वराडे, धरमसिंग चव्हाण, नंदकिशोर सहारे, दामुअण्णा गव्हाणे, राजेंद्र ठोंबरे, नरेंद्र पाटील,रमेश साळवे, शंकरराव खांडवे, विठ्ठल सपकाळ, युवासेनेचे धैर्यशील तायडे, अक्षय मगर, शिवा टोम्पे आदींची उपस्थिती होती.

## बिडकीन येथे पोलीस ठाण्याच्या वतीने आगामी सण उत्सव निमित्ताने पथसंचलन



बिडकीन दि २६ मार्च : हिंदू बांधवांचा तसेच मुस्लिम बांधवांचा येणाऱ्या आगामी सण उत्सव गुढीपाडवा, रामनवमी, हनुमान जयंती,रमजान ईद तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव निमित्ताने शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ विनयकुमार राठोड व अप्पर पोलीस अधीक्षक अन्नापुर्णा सिंह,पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांच्या आदेशावरून पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली दि २५ मार्च रोजी सायंकाळी बिडकीन गावामध्ये पोलीस पथसंचलन करण्यात आले यामध्ये दोन पोलीस अधिकारी व ३५ पोलीस कर्मचारी पथसंचलन मध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, पोलीस उपनिरीक्षक मंजीतसिंग सेना,सहाय्यक फौजदार अशोक सोकटकर, सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे, महादेव निकाळजे, दिलीप साळवे, अप्पासाहेब माळी, संदीप धनेधर, हनुमान धनवे,संजय चव्हाण, मगर,आदी पोलीस कर्मचारी सहभागी होते.

## ॲमेझॉनतर्फे १.२ कोटीहून अधिक उत्पादनांवर शून्य रेफरल शुल्क जाहीर

छत्रपती संभाजीनगर : ॲमेझॉन इंडियाने आज ॲमेझॉन डॉट इन वर देशभरातील लाखो लघु व्यवसायांना पाठबळ देण्यासाठी आतापर्यंतच्या सर्वाधिक विक्रेता शुल्क कपातीची घोषणा केली. ॲमेझॉन डॉट इन वरील विक्रेत्यांच्या वाढीस चालना देण्यासाठी कंपनीने ३०० रु. पेक्षा कमी किमतीच्या १.२ कोटींहून अधिक उत्पादनांवर शून्य रेफरल शुल्क लागू केले आहे. रेफरल शुल्क म्हणजे विक्रेते प्रत्येक विक्री झालेल्या उत्पादनासाठी ॲमेझॉनला देत असलेले कमिशन. आता हे शून्य रेफरल शुल्क १३५ हून अधिक उत्पादन श्रेणींवर लागू झाले आहे. ॲमेझॉनने ईझी शीप आणि सेलर फ्लेक्स सारख्या बाह्य पूर्तता चॅनेल्स वापरणाऱ्या विक्रेत्यांसाठी सरळ, सुलभ फ्लॅट दर देखील लागू केला आहे. त्यामुळे राष्ट्रीय शिपिंग दर आता ६५ रु. पासून सुरू होणार असून यापूर्वी हा दर ७७ रु. होता. ईझी शीप हा एक फुलफिलमेंट चॅनेल असून तिथे ॲमेझॉन विक्रेत्यांच्या ठिकाणाहून पॅकेजेस गोळा करते आणि ग्राहकांपर्यंत पोहोचवते. तर सेलर फ्लेक्स च्या अंतर्गत ॲमेझॉन विक्रेत्यांच्या गोदामाचा काही भाग ॲमेझॉन पूर्तता केंद्र म्हणून व्यवस्थापित करते.

# एमजीएममध्ये 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्स' विषयावरील प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.२६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय. पाथ्रीकर संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्स' या विषयावर सहा दिवसीय शॉर्ट टर्म ट्रेनिंग प्रोग्रॅमचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन आईनस्टाईन सभागृह येथे एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, विषयतज्ञ डॉ. चित्रा वाघ, प्राचार्या डॉ. प्राप्ती देशमुख व सर्व संबंधितांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

डेटा सायन्स बद्दलची प्राथमिक माहिती देत डेटाचे प्रकार, ए-आयमध्ये विविध प्रकारचे डेटा वापरून त्यासोबत मशीन लर्निंग जोडणी कशी करावी त्याचप्रमाणे डेटा व्हिज्युअलायझेशन साधने या पद्धतीने कसे मांडता येतील. डेटा सायन्स मशीन लर्निंग भविष्यकाळातील संधी त्यासाठी विद्यार्थ्यांनी माहिती तंत्रज्ञानासोबत डेटा सायन्स व एआय या विषयाचा अभ्यास करणे गरजेचे असल्याचे डॉ.देसाई यांनी आपल्या उद्घाटनपर सत्रात विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना सांगितले.

या सहा दिवसीय प्रशिक्षणामध्ये अनेक विषयतज्ञांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन सान्वी दर्डा व किसा जाफरी यांनी केले तर आभार डॉ.सतीश संकाये यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ.भारत नाईकनवरे, प्रा.आशिष भालेराव व सर्व संबंधितांनी आपले योगदान दिले.

## जागतिक रंगभूमी दिन साजरा

रंगभूमी दीर्घकाळापासून अनेक प्रख्यात कलाकारांसाठी पाया राहिला आहे, त्यांच्यामधील कला, शिस्तबद्धताा आणि परफॉर्मन्सबाबत सखोल माहितीला आकार देत आहे. जागतिक रंगभूमी दिनानिमित्त रंगभूमीवरून टेलिव्हिजनपर्यंत प्रवास केलेले एण्ड टीव्ही कलाकार रंगमंचाने त्यांना रूपेरी पडद्यासाठी कशाप्रकारे सुसज्ज केले, सामना करावी लागलेली आवहाने आणि रंगमंचाचा आजही त्यांच्या कामावर पडणाऱ्या प्रभावाबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत नीता मोहिंद्रा (कैलाशा बुआ, 'भीमा'), हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'भीमा'मधील नीता मोहिंद्रा ऊर्फ कैलाशा बुआ म्हणाल्या, ''रंगभूमीसह माझ्या अभिनय प्रवासाला सुरूवात झाली, जेथे मी अभिव्यक्ती, देहबोली आणि आवाजातील चढ-उताराचे खरे पैलू शिकले.

## वन्यजीवांचा पाणवठा समर्पण फाउंडेशनच्या पुढाकारातून पुन्हा पुनर्जीवित



सोयगाव,दि.२६ मार्च- सोयगाव येथील समर्पण फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून दि.२५ मंगळवार रोजी सोयगाव भागातील चीचखोरी परिसरात असलेल्या वन्यजीवांसाठी बनवलेल्या पानवट्याला स्वच्छ व सुशोभीकरण करून पुन्हा पुनर्जीवित करण्यात आले.उन्हाळा सुरू झाला तरीही वन्यजीव पाणवठे कोरडे व अस्वच्छ असल्याचे दिसून येत होते. समर्पण फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी हा पाणवठा पुन्हा पुनर्जीवित करण्याचे ठरवले व वनविभागाच्या मदतीने त्यामध्ये पुन्हा पाणी सोडण्यात आले.समर्पण फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही मंदिर स्वच्छता अभियान अंतर्गत ५ मंदिरांची स्वच्छता व सुशोभीकरण केले.वृक्षारोपण कार्यक्रम केला.भविष्यातही असेच उपक्रम आम्ही करणार असून असे अनेक पाणवठे स्वच्छ करून प्रशासनाच्या मदतीने त्यांना पुनर्जीवित करणार असल्याचे समर्पण फाउंडेशनच्या हर्षल हिंदू यांनी सांगितले.या उपक्रमामध्ये अध्यक्ष हर्षल हिंदू,दिपक सोनवणे,सुरेश ताडे,मनोहर आगे,राहुल फुसे,सुदर्शन बारी, सोपान आगे,शंकर मिसाळ,भारत हिरे,कल्पेश चौधरी, संकेत बैरागी,आकाश गव्हाड आणि समर्पण फाऊंडेशन टीम उपस्थित होती.

## वीर हनुमान' मालिका सर्व वयोगटांतील प्रेक्षकांसाठी

हनुमान हे भारताच्या कथाविश्वातील एक महत्त्वाचे आणि पूजनीय व्यक्तिमत्व आहे. त्याच्या भक्तीच्या आणि असामान्य शक्तीच्या कथा पिढ्यान् पिढ्या जनसामान्यांच्या स्मृतीत कोरल्या गेल्या आहेत आणि लोकवाङ्मय, चित्रपट आणि विशेषतः टेलिव्हिजनवरील मालिकांमधून त्यांचा प्रसार झाला आहे.हनुमानाची भक्ती आणि निष्ठा यावर नेहमीच जास्त भर दिला गेला आहे, त्या तुलनेत, त्याचे खोडकर बालपण आणि महान होण्याचा त्याचा प्रवास याचे चित्रण फारसे बघायला मिळत नाही. एक अत्यंत खोडकर मूल ते दिव्यस्वरूप हनुमान होण्यापर्यंतचे हे स्थित्यंतर सोनी सबवरील 'वीर हनुमान' मालिकेत सुंदर पद्धतीने चित्रित करण्यात आले आहे. या मालिकेत आरव चौधरी केसरीची भूमिका करत आहे, सायली साळुंखे अंजनीची भूमिका करत आहे, माहिर पांधी वाली आणि सुग्रीव या दोन्ही भावांच्या भूमिकेत दिसणार आहे, तर बाल हनुमान साकारत आहे बालकलाकार आन तिवारी. प्रत्येक कलाकार आपापली भूमिका चोख बजावत आहे, त्यामुळे त्यांचे व्यक्तिगत प्रवास बघण्याची उत्सुकता प्रेक्षकांच्या मनात जागी झाली आहे.

# दरोडा टाकण्याचा प्रयत्न करणारी टोळी पकडली

नगर : शहरातील बुरुडगाव रोड परिसरातील साईनगर येथील रहिवासी योगेश श्रीकांत चंगेडिया यांच्या राहत्या घरावर दरोडा टाकण्याचा प्रयत्न २२ मार्च रोजी रात्री पावणेतीन च्या सुमारास झाला होता. आरोपींकडून खिडकीचे शटर कटरच्या सहाय्याने तोडण्याचा प्रयत्न सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून आला होता. याबाबत कोतवाली पोलीस स्टेशन येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींचे सीसीटीव्ही फुटेज व



तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत असताना सदरचा गुन्हा हा सागरसिंग बलबीरसिंग जुन्नी, रा. अ.नगर याने त्याच्या साथीदारांसह केला असल्याचे निष्पन्न झाले. स्थानिक गुन्हे शाखेच्या शोध पथकाने निष्पन्न आरोपीचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले. गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता गुन्ह्यातील इतर ४ साथीदारांची नावे त्याने सांगितली. त्यांनाही ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगितले. सदरची कारवाई ही जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी - शहर विभाग अमोल भारती यांचे सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली.

## अरुणाबाई बाबूराव सांगूळे यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर : साऊथ रिपब्लिक सोसायटी सातारा परीसर येथील रहीवासी अरुणाबाई बाबूराव सांगूळे वय ७० वर्षे यांचे आजारापणामुळे राहत्या घरी आज दिनांक २६/०३/२०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, ३ मुले, सुना व नातवंडे असा मोठा परीवार आहे. दैनिक भास्कर चे कर्मचारी सतीश सांगूळे यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या पार्थीवावर सातारा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## २३ वे झी सिने ॲवॉर्ड्स २०२५

दोन दर्शकांपेक्षा अधिक काळापासून झी सिने ॲवॉर्ड्स हे सिनेमॅटिक सर्वोत्कृष्टतेचे प्रतीक राहिले आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोत्तम प्रतिभांचा सन्मान करत आणि जागतिक स्तरावर सिनेमाच्या जादूचा उत्सव साजरा करत या पुरस्कारांनी मनोरंजनाच्या क्षेत्रात नवे उच्चांक प्रस्थापित केले आहेत. अविस्मरणीय परफॉर्मन्सेसपासून ते बॉलीवूडच्या समृद्ध वारशाचा महत्त्वाचा भाग बनण्यापर्यंत हे पुरस्कार विश्वासार्हता आणि लोकप्रियतेचा परिपूर्ण मिलाफ आहेत. हे पुरस्कार केवळ प्रतिभेचाच सन्मान नव्हे, तर प्रेक्षकांच्या पसंतीचाही आनंद साजरा करतात.

## 'तेनाली रामा' मालिकेत राजावर केलेहल्ले

सोनी सबवरील 'तेनाली रामा' मालिकेत कृष्ण भारद्वाजने साकारलेल्या तेनालीच्या बुद्धीचातुर्याच्या सुरसरम्य कथा बघताना प्रेक्षक गुंग झाले आहेत. आगामी भागांमध्ये, तेनालीने लैलाचे खरे स्वरूप उघडकीस आणण्याचा चंग बांधलेला दिसेल. ती खतरनाक विषकन्या आहे याची जाणीव मात्र त्याला नाही आहे. तेनाली राज्यातून हरवलेल्या शाही मोहरचा शोध घेत असताना विचित्र घटना घडू लागतात- लैलाचे संशयास्पद वागणे, पर्शियन पत्र हरवणे आणि घातक घटनांची मालिका. त्या पत्रातील छुपा अर्थ जेव्हा तेनाली शोधून काढतो, तेव्हा त्याची भीती खरी असल्याचे त्याच्या लक्षात येते. त्याला समजून चुकते की लैला एक प्रशिक्षित मारेकरी आहे आणि राजा कृष्णदेवरायावर (आदित्य रेडिज) विषप्रयोग करण्यासाठी ती आली आहे. राज्यात रंग पंचमीचा उत्सव सुरू होतो आणि इकडे लैलाचे कुटिल कारस्थान उधळून लावण्यासाठी रामाचे प्रयत्न सुरू होतात.

# पोहरागड येथील अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा - राहुल राठोड

तभा.वृत्तसेवा

सोयगाव, दि.२६ मार्च : बंजारा समाजासह वंचित,उपेक्षित,शेतकरी,ऊसतोड कामगार बांधवांची काशी समजल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र पोहरागड येथे दि.५ एप्रिल रविवार रोजी अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन सर्व संत महंतांच्या व बंजारा समाजातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत करण्यात आले असून समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवहान बंजारा ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राहुल राठोड यांनी केले आहे.



अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला धर्मगुरू आमदार बाबुसिंग महाराज,महंत कबीरदास महाराज,महंत सुनील महाराज,महंत जितेंद्र महाराज,महंत रमेश महाराज,महंत शेखर महाराज,महंत यशवंत महाराज, महंत खुशाल महाराज,प्रकाश महाराज यांच्यासह भारतभरातून येणाऱ्या प्रमुख बंजारा नेत्यांची उपस्थिती राहणार आहे.

या मेळाव्याला बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड हे मार्गदर्शन करणार असून मागील अनेक वर्षापासून देशपातळीवरील अनेक समस्यांना बंजारा समाज तोंड देत असून त्याकडे शासन प्रशासनाचे लक्ष वेधन्यासाठी तसेच महाराष्ट्रासह आता देशपातळीवर सामाजिक एकजुटीचा निर्णय घेण्याची वेळ आली. असल्याने भारतातील १५ कोटी बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरागड येथे अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी महाराष्ट्रासह १३ ते १४ राज्यातील बंजारा बांधवांची उपस्थिती राहणार आहे.

या अभूतपूर्व ऐतिहासिक मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातील बंजारा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने या जनजागृती मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन बंजारा ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राहुल राठोड यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## आयोजित रोजगार मेळाव्यातून १६२ उमेदवारांची निवड

छत्रपती संभाजीनगर,दि.२६ - कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आज मुकुंदवाडी येथे पार पडला. या मेळाव्यात नोकरीसाठी १६२ उमेदवारांची प्राथमिक तर ७२ जणांची अंतिम निवड झाली आहे, अशी माहिती सहाय्यक आयुक्त सुरेश वराडे यांनी दिली आहे. मेळाव्यात उपस्थित उद्योजक प्रतिनीधींनी आपल्याकडील रिक्तपदांची माहिती देऊन कामाचे स्वरुप व यातून उमेदवारांची होणारी प्रगती याविषयी माहिती दिली. या रोजगार मेळाव्यामध्ये रत्नप्रभा मोटर्स, बी जी ली - ईन इलेट्रिकल्स, अलंकार ग्रूप, इत्यादी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नामांकित नियोक्त्यांनी सहभाग दर्शवून उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

Process Paid Ex. 35
Sandeep M. Saraf, Advocate
Dhule, Dist. Dhule. (Maharashtra)

**PUBLIC NOTICE**

BEFORE THE MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL OF DHULE
Claim For Rs. 25,00,000/-
Claim Petition No. 590 / 2022
Ravindra Julal Wagh
Resident of: Sabghavan, Taluka - Parola, Dist. Jalgaon ...APPLICANT
V/S
Mahesh Rajendra Sant
Resident of: Vihamandava, Taluka - Paithan, Dist. Sambhaji Nagar ..... OPPONENT
(Driver of Suzuki S Cross Car No. MH-20-DV-7299)
Process Paid Ex.
Claim For Rs. 7,00,000 /-
Claim Petition No. 653 / 2022
Mantilal Suklal Gopal
Resident of: Sabghavan, Taluka - Parola, Dist. Jalgaon ..... APPLICANT
V/S
Mahesh Rajendra Sant
Resident of: Vihamandava, Taluka - Paithan, Dist. Sambhaji Nagar ...OPPONENT
(Driver of Suzuki S Cross Car No. MH-20-DV-7299)

Whereas applicants have claimed compensation U/S 166, 140 of the Motor Vehicle Act, 1988 in respect of an accident of the nature specified in Section 166 of the Motor Vehicle Act against you No. 1 you deliberately time to time evade services of notice.

Therefore, you are informed by this legal public notice that, you No. 1 yourself or through your advocate without fail shall remain present before **Accident Claims Tribunal, Dhule, Dist. Dhule, (Maharashtra) on 25/06/2025 at about 10:30 a.m.** If you failed to appear on this date, Tribunal will proceed ex-parte on the presumption that you have no contention to make against the award of compensation.

Given under my hand & seal of the Tribunal this 24/03 day of 2025

Sd/- Jr. Clerk. Dist. Court, Dhule.
STAMP
by order Sd/- Superintendent Dist. Court, Dhule.

## अग्रलेख...

# कुणाल कामराच्या निमित्ताने...

साधारणतः पाच वर्षांपूर्वीची घटना. अर्णब गोस्वामी नामक प्रख्यात पत्रकार इंडिगोच्या विमानाने प्रवास करीत होते. स्वतःला क्रांतिकारी समजणारे एक आगाऊ व्यक्तिमत्त्व याच विमानात होते. अर्णब गोस्वामी यांच्या पत्रकारितेच्या शैलीबद्दल वाद आहेतच आणि त्यांच्याकडे त्या शैलीच्या समर्थनार्थ मुद्देही आहेत. या विषयाच्या संदर्भात वाद करायचा तर एखाद्याने अर्णब गोस्वामींची रीतसर वेळ घ्यावी आणि मग बोलावे. अशा वादाची जागा विमान ही असू शकत नाही. पण, त्या आगाऊ व्यक्तिमत्त्वास या बाबीचे भान नव्हते. त्यामुळे त्याने आगाऊपणा केलाच. अर्णब गोस्वामीच्या विमानात असलेली व्यक्ती अत्यंत आगाऊ होती. त्या व्यक्तीने अर्णबला तिथल्या तिथे 'हिंमत असेल तर रोहित वेमुला आणि अन्य विषयांवरील तुझ्या कव्हरेजबद्दल माझ्याशी वाद कर', असे आव्हान दिले. अर्णब गोस्वामीने त्यावर फार प्रतिक्रिया दिली नाही. ही आगाऊ व्यक्ती इथेच थांबली नाही तर तिने या घटनेची दीड-दोन मिनिटांची चित्रफीत ट्विटरवर टाकून आपल्या पराक्रमाची माहिती जगाला दिली. एका अर्थाने मी अर्णब गोस्वामीची कशी जिरवली, हेच तो सांगत होता. इंडिगो एअरलाईन्सने त्या व्यक्तीच्या विमान प्रवासावर बंदी घालत असल्याचे लगेच दुसऱ्या दिवशी जाहीर केले. त्यानंतर आणखी काही एअरलाईन्सनीही तेच केले. पण, इतक्यावर थांबतो तो विक्रमवीर कसला! त्याने चक्क इंडिगो एअरलाईन्सला कायदेशीर नोटीस दिली आणि पंचवीस लाख रुपयांची भरपाई मागितली. या विक्रमवीराचे नाव आहे कुणाल कामरा! गेली पंधरा-वीस वर्षे तो स्टॅण्ड अप कॉमेडियन म्हणून कार्यक्रम करीत असतो. वादग्रस्त मुद्दे उकरून काढणे आणि वाद घालणे यांत त्याची कारकीर्द विक्रमीच म्हणता येईल एवढे या माणसाबद्दल लिहिण्याजोगे आहे.

अलिकडेच कुणाल कामराने असाच एक कार्यक्रम केला. त्यात त्याने इतर राजकीय नेत्यांसह विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल काही आक्षेपार्ह शब्दांचा समावेश असलेले विडंबनगीत सादर केले. त्यावर प्रतिक्रिया आली आणि शिंदे सेनेच्या शिवसैनिकांनी या कार्यक्रमाचे जेथे चित्रीकरण झाले होते, त्या स्टुडिओची तोडफोड केली. आता हा कामरा माफी मागायला तयार नाही. तो म्हणतो की, घटनेने मला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिलेले आहे. काही उठवळांना, विशेषतः पुरोगामित्वाची झूल पांघरलेल्या काही लोकांना अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा फार लळा आहे. पण, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, हे राज्य घटनेनेच सांगितलेले आहे, हे त्यांना कळत नाही. भारतीय राज्यघटनेच्या १९ (१) (अ) कलमात भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य नागरिकांना बहाल केले गेले आहे. भाषणातून, लेखनातून, कलेच्या माध्यमातून किंवा अन्य माध्यमांतून आपले म्हणणे मांडणे किंवा अभिव्यक्ती करण्याचे स्वातंत्र्य भारतीय राज्यघटना भारतीय नागरिकांना देते. ही अत्यंत महत्त्वाची तरतूद आहे. भारतीय लोकशाहीची ती गरजही आहे. मात्र, याच राज्यघटनेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादाही दिलेल्या आहेत, हे ही मंडळी लक्षात घेत नाहीत. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हा अमर्याद अधिकार नाही. त्याला देशाचे संरक्षण व सार्वभौमत्व, परराष्ट्रांशी असलेले मैत्रीपूर्ण संबंध, सार्वजनिक व्यवस्था, नैतिकता-सभ्यता, बदनामी अशा अनेक आयामांच्या मर्यादा आहेत. अर्थात, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य या मुद्यांच्या मर्यादेत राहूनच उपभोगता येते. हे स्वातंत्र्य कुणाच्या बदनामीचे किंवा कायदा-सुव्यवस्था बिघडवण्याचा अधिकार बहाल करणारे नाही. कुणाल कामराची अभिव्यक्ती त्याच्या दृष्टीने निरुपद्रवी असेल किंवा कलात्मकही असेल. परंतु, त्यामुळे शिवसैनिकांच्या भावना भडकल्या हे खरे. त्याची अभिव्यक्ती हे जर शिवसैनिकांच्या भावना भडकण्यास कारण ठरले असेल तर त्यावर आक्षेप घेतला गेला पाहिजे. स्टुडिओची तोडफोड करणे हा त्यावरचा मार्ग असू शकत नाही. पण, तेही घडले. भावनेच्या भरात घडले असावे. दुसरीकडे कुणाल कामराला आपण जे बोललो, त्याबद्दल खेद-खंत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, कुणाल कामराने व्यंग्य जरूर करावे. आम्हीही दाद देऊ. पण, कुणाची तरी सुपारी घेऊन बदनामी केली जात असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही. मुख्यमंत्र्यांची भूमिका अगदी बरोबर आहे. संविधानाची प्रत हातात घेतल्याने आपल्याला त्यातील तरतुदींचे अमर्याद संरक्षण मिळू शकत नाही, हे कुणाल कामराने समजून घेतले पाहिजे. कुणाल कामराचे काही समर्थक म्हणतात की त्याने जनभावना व्यक्त केल्या. काही वाचाळवीर असेही म्हणतात की, तो जे बोलला ते बरोबर व सत्य आहे. या समर्थनाला पुन्हा राजकीय आयाम आहेत. एकेकाळी आपल्यावर टीका करणाऱ्या पत्रकार-संपादकांवर हल्ला करणाऱ्या पक्षाचे लोक कुणाल कामराचे समर्थन करतात तेव्हा नवल वाटल्यावाचून राहत नाही. टीकाटिप्पणी हा लोकशाहीचा भाग असली तरी ती सभ्य भाषेतच व्हायला हवी. एकीकडे आपण म्हणत असतो की, राजकारणातल्या लोकांनी सभ्यपणा सोडला आहे आणि त्याच वेळी सभ्यपणा खुंटीवर टांगून दुगाण्या झाडणाऱ्याचे कलावंत म्हणून किंवा विचारवंत म्हणून समर्थन करतो. असे कसे चालेल? कुणाल कामरा किंवा अन्य कुणीही अशा प्रकारचे कृत्य केले असेल आणि तरीही त्याला बरोबर ठरविले जात असेल तर हे दुधारी शस्त्र कुणावरही उलटू शकते, हेही सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य ही अतिशय निसरडी संकल्पना आहे. एखाद्याने त्याचा योग्य वापर केला की गैरवापर केला, हे ठरवणे सोपे नाही. बहुतेकदा ते जेवढे त्या व्यक्तीच्या परिपक्वतेवर ठरत असते, तसे ते समाजातील तत्कालीन परिस्थितीवरही ठरत असते. जातीय दंगल झालेल्या भागात इवलासा जातिवाचक उल्लेख देखील आक्षेपार्ह ठरतो. याउलट समाज शांत असेल तेव्हा अशा प्रकारचा उल्लेख विचार करण्यास भाग पाडणाराही ठरू शकतो. त्यामुळे आपण कुणाबद्दल बोलतो आहोत, काय बोलतो आहोत, यासह सध्याचे वातावरण कसे आहे, यावरही अभिव्यक्ती करणाऱ्याने विचार करायचा असतो. भावना भडकवणे किंवा हिंसाचार घडेल अशी चिथावणीखोर वक्तव्ये करणे ही अभिव्यक्ती असू शकत नाही. अभिव्यक्ती हा शब्दच मुळात सुसंस्कृततेचे प्रतीक आहे. तो जसा मत मांडण्याच्या व मांडणाऱ्याच्या अधिकाराचा सन्मान करतो, तसा तो ज्याच्या संदर्भात मत मांडले जात आहे, त्याच्याही अधिकाराचा आदर करतो. कोणत्याही सभ्य समाजात अशाप्रकारचा कोणताही मूलभूत अधिकार अमर्याद असू शकत नाही. तसा तो भारतीय राज्यघटनेतही नाही, हे नवल नव्हे. उलट ते भूषणावह आहे. एकनाथ शिंदे व त्यांची शिवसेना यांना महाराष्ट्रातील जनतेने मतदान केले. त्यांचे आमदार-खासदार निवडून आले. मतदानाला देखील अभिव्यक्तीएवढेच महत्त्व आहे, पावित्र्य आहे. मतदान हा सामूहिक विवेकाचा आविष्कार आहे, असे आपण मानतो. अभिव्यक्ती ही व्यक्ती वा विशिष्ट समूहापर्यंत मर्यादित असते. तरीही तिचे महत्त्व आपण मानतो. मात्र, व्यापक अर्थाने लक्षात घेतले तर मतदानाच्या प्रक्रियेतून जो काही कौल निघेल, त्याचे महत्त्व अशा अभिव्यक्तीहून मोठे असते. निवडणूक, मतदान या प्रक्रियांमधील दोषांवर बोट जरूर ठेवता येते. परंतु, त्यांचे महत्त्व आणि पावित्र्य नाकारता येत नाही. कुणाल कामराने एकनाथ शिंदे यांच्याबद्दल अश्लाघ्य शब्द वापरून चूक केली आहे. त्याच्या वक्तव्यामुळेच शिवसैनिक भडकले. आता मागणे एवढेच की, त्याच्यावर जी कारवाई व्हायची, ती कायद्यानुसारच व्हायला हवी. त्याची प्रक्रिया गुन्हा नोंदवण्यापासून सुरू झालेली आहे. त्याच्या स्टुडिओची, घराची किंवा अन्य कुठलीही तोडफोड करणे किंवा त्याला मारहाण करणे हा मार्ग राज्यघटनेतील तरतुदीनुसार वैध ठरत नाही. आपण एखाद्याला कायद्यातील किंवा राज्यघटनेतील मर्यादांची आठवण करून देत असू तर आपल्या भावना भडकल्या म्हणून आपण अमर्याद वागलो, असे म्हणणे सयुक्तिक ठरणार नाही. अशा घटनांची पुनरुक्ती टाळली पाहिजेच. पण, त्यासाठीचे मार्ग विधायकच असले पाहिजेत. ▮

## चिंतन

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

# लहान शेतकऱ्यांची कर्जमाफी : अडचण आणि उपाय!

कृषिप्रधान भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा शेती असला, तरी शेतकरी, विशेषतः लहान शेतकरी आज मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, कीड-रोगांचा प्रादुर्भाव, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांचे कर्ज वाढत आहे. परिणामी कर्जबाजारीपण आणि आत्महत्यांचे प्रमाण वाढताना दिसते. भारतातील अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांसाठी कर्ज ही मोठी समस्या बनली आहे. विशेषतः लहान शेतकरी आर्थिक अडचणींमुळे अडचणीत येतात. शेतीला अनुकूल हवामान, योग्य बाजारभाव आणि शासकीय मदत न मिळाल्यास त्यांना मोठ्या संकटाला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत कर्जमाफी हा एक चिंतनाचा विषय बनतो. भारतीय शेती मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, गारपीट, पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्ती शेतीच्या उत्पादनावर परिणाम करतात. याशिवाय बियाणे, खते, औषधे, यंत्रसामग्री आणि मजुरी यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. बहुतांश लहान शेतकरी हे आपल्या अल्प उत्पन्नावर अवलंबून असतात. त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर बचत नसते. त्यामुळे शेतीसाठी भांडवल उभे करण्यासाठी त्यांना सावकार, बँका किंवा पतसंस्थांकडून कर्ज घ्यावे लागते. मात्र, उत्पन्न कमी झाल्यास कर्जफेड करणे कठीण होते. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. लहान शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

**शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या समस्या**

**१. हवामानाच्या अस्थिरतेमुळे नुकसान** : अनेक वेळा अवकाळी पाऊस, गारपीट किंवा दुष्काळ यामुळे पिके वाया जातात. शेतकऱ्याचे मोठे नुकसान होते आणि त्याच्यावर कर्जाचा बोजा वाढतो.

**२. बाजारातील अनिश्चितता आणि दलाल** : शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. दलाल आणि व्यापारी यांच्याकडून शेतकऱ्यांना कमी दर दिला जातो, त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते.

**३. महागडी शेतीसामुग्री** : बियाणे, खते, कीटकनाशके आणि आधुनिक तंत्रज्ञान महागडे आहे. यामुळे शेतीचा खर्च वाढतो आणि कर्ज काढण्याशिवाय पर्याय उरत नाही.

**४. सावकार आणि खाजगी कर्जांचा बोजा** : अनेक लहान शेतकरी बँकांपेक्षा खाजगी सावकारांकडून कर्ज घेतात. सावकार मोठ्या प्रमाणात व्याज आकारतात, ज्यामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण उत्पन्न कर्जाच्या फेडीतच संपते.

**५. शेतीसाठी मिळणाऱ्या अनुदानातील भ्रष्टाचार** : शासकीय योजनांतर्गत अनुदाने मिळत असली, तरी खरी गरज असलेल्या शेतकऱ्यांपर्यंत ती पोहोचत नाहीत. यामध्ये अनेक स्तरांवर भ्रष्टाचार होत असल्यामुळे लहान शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. शेतकऱ्यांची कर्जमाफी हा केवळ तात्पुरता उपाय असला, तरी तो गरजेचा आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतो. कर्जमाफीमुळे त्याला पुन्हा नव्याने शेती करण्याची संधी मिळू शकते.

**कर्जमाफीच्या महत्त्वाच्या बाबी**

१. शेतकऱ्यांना तात्पुरता आर्थिक दिलासा मिळतो. २. आत्महत्यांचे प्रमाण कमी होते. ३. शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढते, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारते. ४. नवीन पद्धतीने शेती करण्याची संधी मिळते. कर्जमाफी हा तात्पुरता उपाय आहे, पण शेतकऱ्यांची कायमस्वरूपी आर्थिक सुधारणा होण्यासाठी काही ठोस उपाय करणे आवश्यक आहे.

**१. शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा** : शेतीमालाला सरकारने हमीभाव द्यावा आणि त्यासाठी प्रभावी खरेदी व्यवस्था तयार करावी.

**२. सिंचन व्यवस्था सुधारावी** : लहान शेतकऱ्यांसाठी ठिबक सिंचन आणि जलसंधारणाच्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात.

**३. स्वस्त दरात शेतीसामुग्री उपलब्ध करावी** : खते, बियाणे, कीटकनाशकांच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत.

**४. सरळ बँकांमधून कर्ज मिळावे** : शेतकऱ्यांना थेट राष्ट्रीयीकृत बँकांमधून कमी व्याजदरात कर्ज मिळावे; जेणेकरून खाजगी सावकारांवर अवलंबून राहावे लागणार नाही.

**५. शेतमाल प्रक्रिया उद्योगाला चालना द्यावी** : शेतीमालावर आधारित उद्योग उभारल्यास शेतकऱ्यांना शेतीला जोडधंदा म्हणून स्थिर उत्पन्नाचा स्रोत मिळू शकतो.

**६. कृषी सल्ला आणि प्रशिक्षण उपलब्ध करावे** : शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सेंद्रिय शेती आणि कमी खर्चात जास्त उत्पादन यासाठी प्रशिक्षण द्यावे.

कर्जमाफीबरोबरच शेतीच्या मूलभूत समस्या सोडवल्या तरच शेतकऱ्यांना कर्जाच्या फेऱ्यातून बाहेर काढता येईल. अन्यथा, कर्जमुक्तीचे हे स्वप्न फक्त घोषणांपुरतेच मर्यादित राहील. शेती वाचवायची असेल, तर केवळ कर्जमाफी नव्हे, तर शाश्वत शेतीसाठी ठोस पावले उचलायला हवीत. लहान शेतकऱ्यांचे कर्जमाफ करणे ही तात्पुरती मदत असली, तरी दीर्घकालीन उपाययोजना केल्याशिवाय समस्या कायमस्वरूपी सुटणार नाही. सरकारने शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदतीसोबतच आधुनिक तंत्रज्ञान, जलसंधारण आणि बाजारपेठ सुधारणांवर लक्ष केंद्रित करायला हवे. 'जय जवान, जय किसान' ही घोषणा फक्त घोषणाच राहू नये, तर प्रत्यक्षात शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना राबवायला हव्यात. लहान शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण आणि आत्महत्यांचे वाढते प्रमाण हे राष्ट्रीय आपत्तीचे लक्षण आहे. केवळ कर्जमाफी नव्हे, तर दीर्घकालीन आणि स्थायी उपाययोजना राबवूनच या समस्येचे निराकरण होऊ शकते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार, समाज आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्र येऊन ठोस पावले उचलणे काळाची गरज आहे.

'शेती वाचवा, शेतकरी वाचवा!' ▮

९९८७७४६७७६

## वेध

**गिरीश शेरेकर**

# नॅरोगेज शकुंतला ब्रॉडगेज व्हावी!

पश्चिम विदर्भातल्या वऱ्हाडची त्याकाळी जीवनरेखा ठरलेली शकुंतला रेल्वे २५ डिसेंबर १९०३ रोजी सुरू झाली होती. यवतमाळ ते मूर्तिजापूर आणि मूर्तिजापूर ते अचलपूर अशा दोन टप्प्यांत ही रेल्वे धावायची. वऱ्हाडात मुबलक पिकणारा कापूस मुंबईत आणि तेथून मँचेस्टरच्या सूतगिरण्यांना पुरविण्यासाठी या रेल्वे लाईनची इंग्रजांनी उभारणी केली होती. त्यांनी त्यांच्या फायद्यासाठी ही लाईन उभारली तरी त्याचा स्थानिकांना सुद्धा चांगला फायदा झाला. रोजगाराची साधने वाढली होती. अतिशय कमी तिकिटात खेड्यापाड्यातील नागरिकांचा सुखकर प्रवास होत असल्याने शकुंतला सर्वांची पहिली पसंती होती. विसाव्या शतकाच्या प्रारंभी वऱ्हाडात वाहतुकीची कुठलीही साधने नव्हती, त्या काळात येथील छोट्या-मोठ्या गावांना बाहेरच्या जगाशी जोडणारी शकुंतला रेल्वे ही एकमेव होती. ब्रिटिश काळात या रेल्वेचा प्रवास सहज झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काहीकाळ या रेल्वेचे वैभव अबाधित राहिले. पुढे प्रवासाची साधने वाढली आणि बदलत्या काळानुसार शकुंतलेच्या प्रगतीकडे दुर्लक्ष झाल्याने प्रवाशांनी सुद्धा पाठ फिरविली. थकतभागत २०१७ पर्यंत ही रेल्वे धावली. पण, हा रेल्वे मार्ग ब्रॉडगेज व्हावा यासाठी तत्कालीन खासदार सुदामकाका देशमुख यांच्या काळापासूनच मागणी होत आहे. पुढे अमरावती व यवतमाळच्या प्रत्येक खासदाराने प्रयत्न केले. यश मात्र कोणालाच आले नाही. विद्यमान खासदारांचे पण प्रयत्न सुरूच आहेत.

'जुने ते सोने' असे नेहमी म्हटले जाते. त्यानुसार शकुंतलेची गरज आता प्रकर्षाने जाणवू लागली आहे. तेव्हा नॅरोगेज असलेली ही रेल्वे आता ब्रॉडगेज करून सुरू करावी, अशी मागणी या भागातल्या जनतेकडून सातत्याने होत आहे. या मागणीत तथ्य आहे. तसे पाहिले तर यवतमाळ आता थोडे पण, अचलपूर रेल्वेच्या नकाशावर कुठेही नाही. या दोन्ही शहरांच्या विकासासाठी ते मारक ठरले आहे. हा मार्ग सुरू झाला तर वाहतुकीची एक चांगली सुविधा उपलब्ध होईल. रोजगार, उद्योग धंद्यासह विकासाला चालना मिळेल. येत्या काही वर्षांत अचलपूर वेगळा जिल्हा होणार आहे. पुसद हा वेगळा जिल्हा होणार असल्याने यवतमाळचा भार कमी होणार आहे. विकासाची उंच भरारी घेण्यासाठी रेल्वे मार्ग दोन्ही शहरांसाठी फारच उपयुक्त ठरणार आहे. हा भविष्याचा वेध घेऊनच यवतमाळात शकुंतला रेल्वे विकास समिती तर अचलपुरात शकुंतला रेल्वे बचाव समितीने ब्रॉडगेज मार्गासाठी लढा उभारला आहे. दोन्ही समित्यांची कार्यपद्धती वेगळी आहे. यवतमाळच्या समितीने तांत्रिक माहिती गोळा करून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी व रेल्वे अधिकाऱ्यांना निवेदने देऊन पाठपुरावा सुरूच ठेवला आहे. त्यात समितीचे समन्वयक अक्षय पांडे यांचे योगदान मोठे आहे. शकुंतला सुरू करण्याचा ध्यास या २७ वर्षीय युवकाने घेतला आहे. केंद्र व राज्य स्तरावर होणाऱ्या प्रत्येक घडामोडींवर त्याचे लक्ष असते. अचलपूरची समिती लोकशाही मार्गाने वेगवेगळ्या आंदोलनातून रेल्वे प्रशासन व लोकप्रतिनिधींचे, मंत्र्यांचे लक्ष शकुंतलेकडे वेधत आहे. त्यांनी पण गडकरी व फडणवीसांची भेट घेतली. आतापर्यंत त्यांची ३५ आंदोलने झालीत. दोन्ही लढ्यांचा सामूहिक परिणाम म्हणजे शकुंतलेच्या यवतमाळ - मूर्तिजापूर - अचलपूर या रेल्वे मार्गाचे सर्वेक्षणाचे काम हाती घेतले गेले. शंकुतला रेल्वेचा मार्ग ब्रॉडगेज करण्याला फार खर्च येणार नाही. कारण, या मार्गासाठी एक-दोन स्थानांवरचे अपवाद वगळता नव्याने भूसंपादन करण्याची गरज नाही. खर्च येणार आहे तो नवीन रेल्वे लाईन व स्थानके उभारणीचा! राज्य शासनाने २०२४ अर्थसंकल्पामध्ये सदर मार्गावर होणाऱ्या एकूण खर्चाच्या ५० टक्के निधी देण्याची तयारी दर्शविली आहे. यात फक्त किरकोळ का होईना एक अडचण आहे. ती म्हणजे, सेंट्रल प्रॉव्हिन्सेस रेल्वे कंपनीची! या कंपनीच्या तावडीतून शकुंतला रेल्वेची सुटका झाली. पण, कंपनीने आपला दावा सोडलेला नाही. २०२० मध्ये ही कंपनी मोबदल्यासाठी न्यायालयात गेली होती. लगेच त्यांनी ती याचिका मागे घेतली. सरकार या कपंनीचे समाधान करून तांत्रिक अडचण सहज दूर करू शकते. अंतिम टप्प्यात असलेला रेल्वे लाईनचा प्रकल्प अहवाल सादर होताच मान्यता मिळाली तर वेगाने या मार्गाचे काम सुरू होऊ शकते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मनावर घेतले तर रेल्वे मंत्र्यांना निर्णय घ्यायला काहीच वेळ लागणार नाही. ▮



९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# संघाची पंचसूत्री रामराज्याचा राजमार्ग!




राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष आहे. हे राष्ट्र परम् वैभवाला जावे आणि तेही 'याचि देही याचि डोळा' पाहावे, अशी अपेक्षा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प. पू. आद्यसरसंघचालक डॉ. हेडगेवारांनी व्यक्त केली होती. प्रत्येक स्वयंसेवकाची हीच इच्छा असते. या देशात रामराज्य आलेले डोळ्यांनी पाहावे, ही सर्वांचीच आर्त भावना. याचि देही म्हणजे हा देह जास्तीत जास्त १०० वर्ष आयुष्य असलेला असतो म्हणजे हे राष्ट्र परम् वैभवाला जाण्यासाठी शतक, दीड शतकाचा कालावधी संघाचे द्वितीय सरसंघचालक प. पू. श्रीगुरुजींनाही अपेक्षित आहे. आता संघाला १०० वर्ष पूर्ण होत आहेत. या १०० वर्षांत संघ सार्वभौम झाला, सर्वव्यापी झाला, सर्वस्पर्शी झाला आणि सर्वायामी झाला. संघविचार आचारासह घराघरांत आणि मनामनांत पोहोचला, हे सत्य आहे. कुंभमेळ्यात अर्धा भारत श्रद्धेने उपस्थित होता, हे संघविचाराचे फळ आहे. असे असले तरी संघाच्या शतक पूर्व वर्षीच्या विजयादशमी उत्सवात विद्यमान सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवतांनी पंचसूत्री का मांडली असावी? या पंचपरिवर्तनावर शताब्दीनिमित्ताने स्वयंसेवक समाजात का जाताहेत, हे प्रश्न साहजिकच आहेत.

ही पंचसूत्री, पंचपरिवर्तन, पंचोपचार, पंचपदी केवळ स्वयंसेवकांसाठी नसून भारतात राहणाऱ्या नव्हे विश्वातील सर्वांसाठी उपयोगी, महत्त्वाची आणि गरजेची आहे. भारतात तर संघ स्वयंसेवकांनी १०० वर्ष तनमनधनपूर्वक आणि निरपेक्ष कार्य केल्यामुळे 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' या विचाराला पोषक वातावरण झाले आहे. तयार झालेल्या शेतीत आता पेरणी बाकी आहे. विचाराचे दाणे टाकताच बहर येणार आहे. १०० वर्षांत हे राष्ट्र परम् वैभवाला जाण्यासाठीची मशागत पूर्ण झाली असून पंचसूत्री हे बीजारोपण आहे. यातूनच रामराज्याची ही मुहूर्तमेढ ठरणार म्हणून पंचपरिवर्तन महत्त्वाचे आहे.

**काय आहे पंचसूत्री?**

१) सामाजिक समरसता २) कुटुंब प्रबोधन ३) पर्यावरण संरक्षण ४) 'स्व'चा बोध अर्थात स्वदेशी ५) नागरी कर्तव्ये. ही ती पाच सूत्रे आहेत. बारकाईने विचार केल्यास हा रामराज्याचा जाहीरनामा आहे.

ज्या समाजात सर्वांना समान स्थान, समान संधी आणि सर्वांसाठी समभाव आहे तो समाज रामराज्यातच असू शकतो. १४ एप्रिल १९८३ ला गुढीपाडवा होता. या दिवशी प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संघसंस्थापक प. पू. डॉ. हेडगेवार या दोन्ही पुण्यात्म्यांची जयंती होती. या पवित्र दिवशी सामाजिक समरसता मंचाची स्थापना झाली. या प्रसंगी संघाचे प्रचारक आणि डॉ. आंबेडकरांचे स्नेही स्व. दत्तोपंत ठेंगडी यांचे बीजभाषण झाले. त्यात त्यांनी सामाजिक समरसता आणि समरस समाजाची संकल्पना स्पष्ट केली होती. तीच कडी पकडून विद्यमान सरसंघचालकांनी सामाजिक समरसतेला अग्रक्रम दिला. कारण १०० वर्ष संघ स्वयंसेवकांनी नि:स्वार्थ आणि निरपेक्ष कष्ट करून पोषक वातावरण निर्माण केले आहे. सामाजिक समरसता समाजात बहुअंशी निर्माण झाली आहे. एक देवालय, एक पाणवठा, एक स्मशान, एक पंगत आता अपवाद वगळता बहुतेक गावात रुजले आहे. १९८९ मध्ये डॉ. हेडगेवार जन्मशताब्दीला संघाचा सेवा विभाग प्रारंभ झाला आणि श्रीगुरुजींच्या जन्मशताब्दीला २००६ मध्ये संघाचा सामाजिक सद्भाव विषय सुरू होऊन कार्य शेवटच्या माणसापर्यंत झिरपले आहे.

पंचपरिवर्तनात दुसरे स्थान कुटुंब प्रबोधनाला दिले आहे. भगवान श्रीरामांच्या कुटुंबाइतके आदर्श कुटुंब दुसरे असूच शकत नाही. भावा-भावाचे, जावा-जावाचे, पिता-पुत्राचे आणि पती-पत्नीचे आदर्श म्हणजे श्रीराम भगवंताचे कुटुंब आहे. कुटुंबव्यवस्था भारताचा प्राण आहे. एकत्रित कुटुंब पद्धत असल्यामुळे घर हे संस्कार केंद्र होते. घरातूनच चारित्र्यसंपन्न मनुष्य निर्माण कार्य सहज व्हायचे. देव, देश आणि धर्माचे संस्कार आजी-आजोबा, काका-काकू, आई-बाबा यांच्या आचारविचारांतून होत असत. कालमानाप्रमाणे संयुक्त कुटुंब पद्धतीला दृष्ट लागली. घर भारतात असले तरी घरात भारत नाही, हे कटु सत्य आहे. म्हणूनच सरसंघचालकांनी कुटुंब प्रबोधनाला महत्त्व दिले. 'आहे त्या परिस्थितीला पाहिजे तसे घडवणे' हेच आपल्या हातात आहे.

जीवीचा जिव्हाळा, प्रेम, आदर, यथाधिकार, मानसन्मान हे संस्कार कुटुंबात झालेच पाहिजेत त्यासाठी प्रबोधन. विभक्त असलो तरी सणावाराला एकत्रित येणे, आठवड्यात एक दिवस सामूहिक व्हिडीओ कॉल अशा अनेक बाबी कुटुंबाला एकत्रित ठेवू शकतात. म्हणूनच त्यांनी कुटुंबासाठी पंचोपचार सांगितले. भाषा, भूषा, भजन, भोजन आणि भ्रमण. कुटुंबात बोलताना मातृभाषेचा वापर झाला तर बुद्धीचा विकास चटकन होतो, संस्कृतीचे संस्कार सहज संक्रमित होतात. आपली परंपरागत वेशभूषा भारतीयत्व जागे ठेवते. कुटुंबात एकत्रित भजन आणि भोजन जीवीचा जिव्हाळा घट्ट करतो. तीर्थक्षेत्रावर केलेले भ्रमण सद्भाव निर्माण करते. रामराज्यातील कुटुंब म्हणजे अजून दुसरे काय असेल?

पंचसूत्रीमध्ये तिसऱ्या स्थानावर पर्यावरण संरक्षण आहे. रामराज्यात पर्यावरणाचे महत्त्व महर्षी वाल्मीकिंनी स्पष्ट विशद केले आहे. खरं तर भारतीय संस्कृती ही एकमेव संस्कृती आहे, ज्यात व्यष्टी, समष्टीसोबत सृष्टीला महत्त्व दिले आहे. सृष्टीला महत्त्व दिले तरच परमेष्ठी पदापर्यंत जाता येते.

'माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः' पृथ्वीला माता मानणारी आपली संस्कृती आहे म्हणूनच आपण तुळस, वड, उंबर, गाय, कुत्रा, नद्या, सागर, पर्वत, सूर्यादि ग्रह मंडलाची पूजा करतो. पर्यावरणपूरक बाबी आपल्या सर्वांचा स्थायीभाव बनावा म्हणून सरसंघचालकांनी याबाबत विशेष स्पष्टता आणि आग्रह केला आहे.

पंचसूत्रीमध्ये पुढील सूत्र म्हणजे 'स्व'चा बोध. हा चौथा बिंदूही विशेष महत्त्वाचा आहे. आध्यात्मिक आणि राष्ट्रीय असा हा विचार. व्यवहार म्हणून विचार केला तर आणि प्रत्येक भारतीय माणसाने स्वदेशीचा वापर केला तर या देशातील अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत होईल. शिवाय स्वदेशीचा अंगीकार देशभक्तीचे जागरण करेल. हा झाला एक भाग. 'स्व'च्या बोधाचा आध्यात्मिक दृष्टिकोनही महत्त्वाचा आहे. मी कोण? मी कशासाठी आलो? माझे कर्तव्य काय? माझे ध्येय काय? या अशा अनेक प्रश्नांच्या अनुषंगाने कार्यरत राहून उत्तर शोधणे म्हणजे 'स्व'चा बोध होय.

पंचसूत्रीमध्ये पाचवे सूत्र 'नागरी कर्तव्ये' हे आहे. 'वयं राष्ट्रे जागृयाम' हे आपले सूत्रच आहे. रामराज्यात यावरच भर होता. या देशाप्रती, समाजाप्रती नागरिक म्हणून आपली काही कर्तव्ये आहेत. माणसे नागरी हक्कासाठी सतत भांडत असतात, पण नागरिक म्हणून आपली काही कर्तव्ये, काही जबाबदाऱ्या आहेत. त्याकडे लक्षपूर्वक दुर्लक्ष करतो आपण. देशातील राष्ट्रीय, सामाजिक, आर्थिक अशा सर्वच समस्यांचे मूळ नागरी कर्तव्याकडे दुर्लक्ष आहे.

थोडक्यात विजयादशमी उत्सवात प. पू. सरसंघचालकांनी दिलेली पंचसूत्री रामराज्याचा मार्ग प्रशस्त करणारी आहे. रामराज्यात समाजात समरस भाव होता. रामराज्यात कुटुंबव्यवस्था मजबूत आणि बळकट होती. रामराज्यात सृष्टीचा विचार अग्रक्रमावर होता. रामराज्यात 'स्व'चा भाव महत्त्वाचा होता. व्यापारउदिमात स्वराज्यातील तरुणाईला प्रोत्साहन असे. नीतिमत्ता, शुद्ध चारित्र्य आणि समाजाप्रती कर्तव्यभाव असल्यामुळे सर्वत्र शांतता आणि सुव्यवस्था होती. रामराज्यात प्रजा, राजा, राज्य यांच्यात प्रखर समन्वय आणि एकमेकांप्रती निष्ठा होती. हे राष्ट्र परम् वैभवाला नेण्यासाठी ही पंचसूत्री महत्त्वाची आहे. 'याचि देही याचि डोळा' पाहावयाचे असल्याने यावर विशेष लक्ष दिले जात आहे. म्हणूनच प. पू. सरसंघचालकांनी सांगितलेली पंचसूत्री रामराज्याचा राजमार्गच आहे. ▮

९८२२२६२७३५

### नागपुरातील बांधकाम आणि त्यांच्या वेळा

सध्या नागपुरात अनेक ठिकाणी बांधकाम सुरू आहे. बांधकामासंबंधी अनेक नियम अथवा कायदे असतीलच. त्यात बांधकामाच्या वेळा याविषयी नियम आहे किंवा नाही हे सामान्य नागरिकांना समजणे कठीण आहे. दिवस-रात्र हे बांधकाम सुरू असते. पहाटेपासून सुरू होणारे काम रात्री-बेरात्री सुरू असते. तऱ्हेतऱ्हेचे कानठळ्या बसणारे आवाज येत असतो. प्रश्न असा आहे की, नागरिकांनी शांत झोप केव्हा घ्यावी? ध्वनिप्रदूषणाच्या गंभीर परिणामांची कल्पना सर्वांनाच असावी. घरात लहान बालके, थकून आलेले कर्मचारी, घरातील ज्येष्ठ नागरिक, आजारी या सर्वांनी शांत झोप केव्हा घ्यावी? रोज त्या मजुरांशी किंवा ठेकेदाराशी वादविवाद, भांडणे होत असतात. पोलिसात तक्रार केल्यास पोलिस येतात. आपले काम करतात व जातात. पोलिस जाताच काम पुन्हा सुरू होते. पोलिसात तक्रार केली म्हणून धमक्या दिल्या जातात. शांत झोपेची सर्वांनाच आवश्यकता आहे आणि ती झाली पाहिजे. त्यासाठी आवश्यक असलेल्या नियमांची अंमलबजावणी व्हावी एवढीच अपेक्षा.



**ललिता देशपांडे**/नागपूर

## वाचक पत्रे

### सूर्योदयानंतर पथदिवे बंद व्हावे

सूर्योदय झाल्यानंतर पथदिवे सुरू असणे काही उपयोगाचे नाही. मी बऱ्याच ग्रामपंचायतीमध्ये हा विषय मांडत असतो. पण अंमलबजावणी होत नाही. आजच्या काळात सेन्सर आहे. टाईमर आहे. मनुष्यबळ आहे. तरी आजही सकाळी ८ वाजेपर्यंत पथदिवे सुरूच दिसतात. अडीच तास उशिराने पथदिवे बंद होणे म्हणजे लाखो रुपयांचे नुकसान होणे आहे. हे मी एका मीटर बॉक्स अंतर्गत असलेल्या पथदिव्यांबद्दल म्हणत आहे. एखाद्या मोठ्या ग्रामपंचायतमध्ये ११ ते १२ पथदिवे बॉक्स असतात. यापैकी अर्धे उशिरा बंद केले गेले तरी महिन्यात ते लाखोमध्ये नुकसान होते. याविषयी संबंधितांनी काळजी घ्यावी.

**पद्माकर नानोटे**/७२१८८९७४५२

### विदर्भवाद्यांचा आत्मनाश

नुकतेच नागपुरात विदर्भवाद्यांचे संमेलन झाले. यातील एकाही नेत्याने नुकत्याच घडलेल्या नागपूर दंगलीचा साधा निषेध केला नाही! नागपूर राजधानी सुरक्षित असण्याची कोणतीही मीमांसा न करता झारखंड प्रणीत विदर्भ बनविणे हा विदर्भवाद्यांचा आत्मनाश आणि वैदर्भीय जनतेचा विश्वासघात ठरतो! केवळ केंद्र सरकारला दोष देण्यापेक्षा वैदर्भीय मतदारसंघांची पुनर्रचना महत्त्वाची आहे. कारण रामटेक आणि अमरावती हे दोन मतदारसंघ चुकीच्या पद्धतीने आरक्षित असून ते खुल्या प्रवर्गासाठी असावेत. कापूस आणि संत्री उत्पादन हा विदर्भाचा मानबिंदू असूनही शेतकऱ्यांसाठी या तथाकथित नेत्यांनी काय केले? गमावलेला जनतेचा विश्वास संपादन करण्याची ही केवळ क्लृप्ती आहे.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

### कलाकाराने आपल्या मर्यादा ओलांडू नये

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील अपमानास्पद गाणे कुणाल कामरा याच्या चांगलेच अंगलट येण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे या राज्याचे माजी मुख्यमंत्री आहेत. शिवसेनेचे नेतृत्व त्यांच्या हाती आहे तसेच आज राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय राज्यात ७ खासदार, ६० आमदार इतका प्रचंड जनादेश असलेले नेते आहेत. त्यामुळे अशा व्यक्तीबाबत अपमानस्पद बोलताना कुणाच्या भावना दुखावल्या जाणार नाही याची काळजी घेण्याची गरज होती. कामराच्या अशा कृत्यामागे कुणाची प्रेरणा आहे ज्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न सुद्धा निर्माण होऊ शकतो हे सुद्धा तपासले पाहिजे. आजवर अनेक विनोदी कार्यक्रमांतून विडंबनपर अनेक काव्ये झाली पण यातून कुणाच्या भावना दुखावण्याचा किंवा कुणाचा अपमान करण्याचा हेतू नव्हता. राजकीय पक्ष एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत असतात परंतु एखाद्या कलाकाराने यात पडू नये. कारण कुठलीही कला ही विशिष्ट व्यक्ती, पक्ष याचं समर्थन किंवा विरोध करू शकत नाही. त्यामुळे कलाविश्वाचा सन्मान राखायचा असेल तर कुणाल कामराने माफी मागितलेलीच बरी. आज शिंदेंना लक्ष्य केलं, उद्या आणखी दुसऱ्याचा होईल. त्यामुळे हे आजच थांबले पाहिजे. कलाकाराने आपली कला सादर करताना आपल्या मर्यादा ओलांडू नये हेच यानिमित्ताने सांगावेसे वाटते. ▮

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जालना शहरातील 'त्या' भूखंडावरील खरेदी -विक्री व्यवहारांना मुख्यमंत्र्यांकडून स्थगिती

## आमदार अर्जूनराव खोतकर यांनी विधानसभेत गाजवला होता मुद्दा

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



जालना शहरातील सर्वे क्रमांक ५५३तसेच ५५८,५५९ व ५६० मधील भूखंड खरेदी- विक्री व अन्य संदर्भातील बाबींना विभागीय आयुक्तांचा अहवाल व फाटक आयोगाच्या शिफारशी अंतिम होईपर्यंत स्थगिती देण्यात आली असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी ( दि. २६) विधानसभेत केली. आमदार अर्जूनराव खोतकर यांनी गत आठवड्यात या भुखंडाचा मुद्दा उपस्थित करून विधानसभा गाजवली होती.

जालना शहरातील सर्वे क्रमांक ५५३ तसेच ५५८,५५९ व ५६० मध्ये भूखंड घोटाळा झाला असल्याचा मुद्दा आमदार अर्जूनराव खोतकर यांनी दिनांक १९ मार्च रोजी विधानसभेत उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले होते.

या जमीन घोटाळ्याची सविस्तर माहिती सादर करतांना शासनाने फाटक कमिशनचा अहवाल मिळवून 'आबड वारको वर्ल्ड' मधील बेकायदा व्यवहार थांबविण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली होती. तसेच याच बनावट सर्वे क्रमांक ५५३ मधील आरक्षित जागेवर जे बांधकाम करण्यात आले आहे, ते पाडण्याची नोटीसही जालना मनपाने दिल्याचे निदर्शनास आणून दिले होते.



विधानसभेत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी हजारो कोटीचा जमीन घोटाळा उघडकीस आणल्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'आबड वार्को वर्ल्ड' सह चारही सर्वे क्रमांकमधील जमीन व्यवहारावर बंदी आणण्यात आली असल्याचे जाहीर केले होते.

आमदार खोतकर यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या जालना शहरातील सदरील सर्वे क्रमांकाच्या जमीन घोटाळा प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी ( दि. २५) विधानसभेत बोलतांना जालना शहरातील सर्वे क्रमांक ५५३तसेच ५५८,५५९ व ५६० मध्ये भूखंड गैरव्यवहार प खरेदी- विक्री व्यवहार, नवीन ले आउट मान्यता,फेरफार नोंदी संदर्भातील बाबींना विभागीय आयुक्तांचा अहवाल व फाटक आयोगाच्या शिफारशी अंतिम होईपर्यंत स्थगिती देण्यात आली असल्याची घोषणा केली. यासंदर्भात अंतिम अहवाल आल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येणार असून मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी जाहीर केले.

# शिवसेना जिल्हाप्रमुखपदी ए.जे.बोराडे यांची नियुक्ती; कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी शिवसेनेच्या जालना जिल्हा प्रमुखपदी ए. जे. बोराडे यांची नियुक्ती केल्याने मंठा, परतूर तालुक्यासह जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष व्यक्त केला. ना. शिंदे यांनी माजी मंत्री तथा आ. अर्जुनराव खोतकर, आ. हिकमतराव उढाण, शिवसेना सचिव संजय मोरे, उपनेते आनंद जाधव, संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर यांच्या उपस्थितीत ए जे बोराडे यांना जिल्हाप्रमुख पदाचे नियुक्तीपत्र दिले. श्री बोराडे यांनी आपल्या ३० ते ३५ वर्षाच्या सामाजिक आणि राजकीय कार्यकाळात समाजाभिमुख व लोकोपयोगी अनेक कामे केली. त्यांनी मोर्चे आणि आंदोलनाच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकासह त्यांनी बहुतांश ग्रामपंचायतीवर कार्यकर्त्यांना संधी दिली. ए. जे. बोराडे यांनी यापूर्वी उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख म्हणून १६ वर्षे जबाबदारी सांभाळली. उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी जालना येथे झालेल्या प्रवेश सोहळ्यात ए जे बोराडे यांच्या कामाचे कौतुक केले होते. त्यांच्यावर जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी दिल्यानंतर आता कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष केला. त्यांच्या नियुक्तीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आज रविवार ता. २३ रोजी मंठा येथे आगमन होताच बाजार समितीच्या आवारात त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. शिवसेनेचे मुख्य नेते, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांनी जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी दिली असून या माध्यमातून जिल्ह्यात शिवसेनेचे संघटन मजबूत करणार असून सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी सांगितले.

# संक्षिप्त

## कै.सौ.वर्षा चौधरी यांच्या प्रित्यर्थ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

शहरातील सारंग चौधरी यांनी त्याच्या पती कै. सौ.वर्षा सारंग चौधरी यांच्या द्वितीय पुण्यतिथी प्रित्यर्थ ३५० विद्यार्थ्यांना पाणी बॉटल, टिफिन डबे वाटप केले आहे. भोकरदन शहरातील बुधवारी (दि.१९)कै. सौ.वर्षा सारंग चौधरी यांच्या द्वितीय पुण्यतिथी प्रित्यर्थ इतर खर्च टाळू विद्यार्थ्यांना उपयोगी साहित्य वाटप केले. यात कन्या शाळा भोकरदन, प्राथमिक शाळा महालनवाडी, प्राथमिक शाळा नवी भोकरदन, प्राथमिक शाळा शिवाजीनगर या शाळेच्या एकुन ३५० विद्यार्थ्यांना हॉटस्पॉट जेवणाचे डबे ,पाणी बॉटल वाटप करण्यात आले. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष मुकेशचिने, शिवसेना शिंदे गटाचे नेते भूषण शर्मा, शशीभुषण चौधरी, मुन्ना पांडे, संजय शर्मा, स्वप्निल शर्मा, मुख्याध्यापक गवळी, मुख्याध्यापक दिपक जाधव, सौ चारुशीला पैठणकर, गणेश शर्मा यांच्या

## जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राज्यात जुन्या वाहनावर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याचे काम कमी झाले आहे. त्यामुळे एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनावर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यासाठी दि.३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी स्थानिक वाहन वितरक, ऑटोरिक्षा,टैक्सी, बस आणि ट्रक संघटनांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## अनवा रोडवर आलापूर शिवारात शेतातील उभ्या पिकाला आग;शेतकऱ्यांचं आर्थिक नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन शहरालगत असलेल्या भोकरदन -अनवा रोडवर आलापुर शिव- ारात उभ्या पिकाला आग लागल्याची घटना घडली.यामध्ये शेतात सोंगून ठेवलेली मका,गहू त्याच बरोबर ईतर पीकं जळून खाक झालीय.या शेतातून विजेचे तार गेले आहेत.आणि याच तारांचा एकमेकांना स्पर्श होऊन शॉर्ट सर्किट झाल्यानं ही आग लागल्याची घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.जवळपास १३ ते १५ एकर क्षेत्रावर ही आग लागली या पैकी १० एकर क्षेत्रावरील मका आणि गव्हाचं पीक जळून खाक झालय.शिवाय ठिबक आणि तुषार सिंचनाचे पाईप देखील जळाल्याने मोठं नुकसान झालंय.घटनेची माहिती मिळताच भोकरदन नगर परिषदेच्या अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि ही आग आटोक्यात आणली. या आगीत शेतकऱ्यांचं मोठं आर्थिक नुकसान झाल्यामुळे नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

## सुमनबाई वांगे यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भाजी मंडी काद्राबाद येथील रहिवासी गं.भा. सुमनबाई शंकराप्पा वांगे यांना शुक्रवार दिनांक १४ मार्च २०२३ रोजी निधन झाले. त्यांना वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धापकाळाने काद्राबाद येथील निवासस्थानी देवाज्ञा झाली. त्यांच्या पश्चात त्यांना २ मुले १ मुलगी व सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# किरकोळ वादातून दोघांनी मिळून बंदूकच्या साह्याने केले एकाला जखमी; मंठा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी,**

मंठा तालुक्यातील दिनांक २२.०३.२०२५ रोजी मागचा किरकोळ वादाच्या राग मनात ठेवून एका इसमावर भरदिवसा पिस्तूलच्या साहाय्याने जखमी करण्याची घटना मंठा तालुक्यातील मंठा लोणार रोड येथे आहेरे पेट्रोल पंप येथे घडली आहे.

सूत्रांकडून मिळालेली माहिती अनुसार दुपारी बारा वाजेच्या सुमारास मंठा ते लोणार रोड वरिल आहेरे पेट्रोलपंप येथे विकास बंडु चव्हाण वय २२ वर्ष रा ढोकसाळ हे पैशाची गरज असल्याने पेट्रोल पंम्पावर पैसे काढण्यासाठी गेलो असता तेथे अविनाश लक्ष्मण चव्हाण व युवराज उघडे दोन्ही रा. पिंपरखेडा खराबे या दोन आरोपी विकास चव्हाण ला तिथे पाहताच म्हणाले हा त्या दिवशीचा आपल्या सोबत ढोकसाळ शाळेसमोर भांडन करणारा हा मादरचो.. आहे. असे पाहताच विकास चव्हाणने विचारले तुम्ही मला शिवीगाळ का करता ?

असे म्हणताच अविनाश चव्हाण याने पुन्हा शिवीगाळ करुन मला चापटा बुक्याने भरघोस माराहाण केली त्यावेळी अविनाश चव्हाण याच्या हातामध्ये बंदुक होती तीची मुठ विकासच्या डोक्यात मारुन त्याला जखमी केले आणि म्हणाले हा लय मस्तीला आला यास पकड असे युवराज यास म्हणाला असता युवराज याने त्याचे खीशातील फायटर काढुन पुन्हा विकासच्या डोक्यात मारुन दुखापत केली आणि म्हणाला तु जर परत आमच्या नादी लागला तर तुला व तुझ्या कुटुबालासहित जिवंत मारुन टाकण्याची धमकी विकास चव्हाणला दिली आहे. याघटनेचा मंठा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कैलास भरती हे करत आहे.

# अवैध गौण खनिज वाहतूक व चोरी प्रकरणी विविध वाहनधारकाविरुद्ध महसूल विभागामार्फत दंडात्मक आदेश

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील अवैध गौण खनिज वाहतूक व चोरी प्रकरणी विविध वाहनधारकाविरुद्ध महसूल विभागामार्फत दंडात्मक कायद्याअंतर्गत त्यापैकी मागील वर्षभरातील काही वाहनधारक यांनी जाणीव- पूर्वक दंड न भरल्याने मोठ्या प्रमाणात रक्कम वसूल करणे बाकी आहे...

सदर वसुली करण्याकरता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या विविध कलमांचा वापर करून सदर दोशी/कसूरदार वाहन व व्यक्तीविरुद्ध दंडात्मक आदेश आधीच झालेल्या वाहनधारक व्यक्ती विरोधात वसूल करण्याकरता चे आदेश देण्यात येत आहेत

सदर आदेशामध्ये वाहनधारक यांचे नावे असलेल्या स्थावर मालमत्ता, घर, बँक अकाउंट तसेच त्यांच्या नावावर असलेल्या वाहनावर बोजा चढवण्याची कारवाई करण्यात येत आहे. सदर बोजा चढवल्यानंतर दंडाची रक्कम भरले नाही तर त्यांच्याविरुद्ध ज्या प्रॉपर्टीवर बोजा चढवण्यात आलेला आहे त्या प्रॉपर्टीच्या लिलाव करून तसेच सदर प्रॉपर्टीवर महाराष्ट्र शासन असे नाव लिहून ताब्यात घेण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे . सोबत कसूरदार यांची यादी प्रसिद्ध करत आहोत काही कसूदार यांचे नावे प्राप्त करून घेऊन पुढील कार्यवाही करण्याकरता तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, सर्व बँक मॅनेजर, उप प्रादेशिक परिवहन विभाग यांना सुद्धा आदेशित करण्यात आलेले आहे.

सदर व्यक्तींचे विविध बँकेत असलेले खाते सुद्धा गोठवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे..

यामुळे अवैध गौण खनिज वाहतुकी करता वापरण्यात आलेले वाहन, तसेच खाजगी मालमत्ता यावर बोजा चढवल्यामुळे वाळू चोर यांचे मुसक्या नक्कीच आवडल्या जाणार आहेत.

# शिधापत्रिकाधारकांनी ३१ मार्चपूर्वी ई-केवायसी करून घ्यावी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालन्यातील शिधापत्रिकाधारकांनी ३१ मार्चपूर्वी ई - केवायसी करून घ्यावी असं आवाहन जालना तहसीलदार छाया पवार यांनी आज दिनांक २४ सोमवार रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास शिधापत्रिकाधारकांना केलंय. शिधापत्रिकाधारकांनी ३१ मार्चपूर्वी ई- केवायसी न केल्यास त्यांचं रेशनचे धान्य बंद होईल अशी माहिती जालना तहसीलदारांनी दिलीय. शिधापत्रिकाधारकांना ई - केवायसी करण्यासाठी मेटा ई - केवायसी हे मोबाईल प उपलब्ध असून लाभार्थ्यांना घरबसल्या ई - केवायसीची प्रक्रिया पूर्ण करता येते. त्यामुळे, शिधापत्रिकाधारकांनी ३१ मार्च पूर्वी आपली ई - केवायसी करून घ्यावी नसता त्यांचं रेशन बंद करण्यात येईल अशी माहिती जालना तहसीलदारांनी दिलीय. दरम्यान, जालना तालुक्यात आतापर्यंत एकूण ६८ टक्के लाभार्थ्यांनी ई - केवायसीची प्रिक्रिया पूर्ण केली असल्याची माहिती जालना तहसीलदार छाया पवार यांनी दिलीय.

# आनंद फाऊंडेशन मुंबई यांच्या वतीने लोककलावंताचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**टेंभूर्णी प्रतिनिधी**

नुकतेच मुंबई येथे आनंद फाऊंडेशन यांच्या वतीने दिनांक १५ व १६ मार्च महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील लोककलावंताचा कार्योयक्रम आयोजित करून, त्यांचा गौरव करण्यात आला आहे. यामध्ये जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील अकोला देव येथील मानव सेवा सांस्कृतिक कला मंच चे. चालक अनिल भदर्गे व सहकारी यांचा सुद्धा मुंबई लोककला अकादमीचे प्रमुख व जालना जिल्ह्याचे भुमी पुत्र डॉ. प्रा.गणेश दादा चंदनशिवे यांच्या हस्ते सत्कार करून गौरविण्यात आले.

यावेळी अनिल भदर्गे यांनी सांगितले की, जाफराबाद



तालुक्यातील लोककलावंत हृदय सम्राट आमचे डॉ . गणेश चंदनशिवे यांच्या पुण्यानं मानव सेवा सांस्कृतिक कला मंच अकोला देव यांना मुंबई दर्शनाची संधी मिळाली. अनेक विषयावर दादा चंदनशिवे यांच्या सोबत चर्चा झाली . ही मराठवाड्यातील लोक कला जिवंत कशी राहील यासाठी गणेश दादा चंदनशिवे यांनी सर्व लोक कलावंत यांना मार्गदर्शन केले यावेळी आनंद फाऊंडेशन मुंबई याच्या संस्थापक अध्यक्षा अपूर्वा ताई वैद्य, महेश सर शाहीर अप्पा साहेब उगले, जालना शाहीर गिरी नांदेड, शाहीर बळीराम घोगरे लातूर, राहुल कासोद , विष्णू गोडबोले व मानव सेवा सांस्कृतिक कला मंच चे भगवान मगरे, दादाराव साबळे, संगीता दिलीप छडीदार, शाहीर अनिल भदरगे यांची उपस्थिती होते.

# तांड्यातील समस्या सोडविण्यासाठी कायम कटीबध्द -अर्जुन राठोड

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील लमान तांड्यांना सुख सुविधांनी समृध्द करण्यासाठी शासनाने विविध योजना राबविल्या असुन त्याच अनुषंगाने आज अशासकीय सदस्य अर्जुन नायक राठोड यांच्या उपस्थितीत गटविकास अधिकार्यांसह ग्रामपंचायतच्या अधिकार्यांसमवेत बैठक पार पडली, यावेळी बंजारा बांधवांच्या विविध समस्या आणि समृध्दी बाबत अर्जुन नायक राठोड यांनी आपले मनोगत व्यक्त करून बंजारा बांधवांना समृध्द करण्यासाठी जे जे प्रश्न आहेत, ते मांडून बंजारा समाजाचे अस- लेले विविध प्रश्न मांडून संबंधीतांचे लक्ष वेधून त्या समस्या सोडविण्यासाठी



सर्वोतोपरी प्रयत्न करणार हेच दाखवुन दिले आहे.

पंचायत समिती परतूर येथे संत सेवालाल महाराज बंजारा, लमान तांडा समृद्धी योजना अंतर्गत तांड्याना महसूली दर्जा देऊन ग्रामपंचायत निर्माण करण्या संबंधी आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी अर्जुन राठोड अशासकीय सदस्य जिल्हाधिकारी कार्यालय जालना परतूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, श्री राजेश तांगडे साहेब, ग्रामपंचायत अधिकारी, उपस्थित होते. या बैठकीस तालुकास्तरीय समितीचे अशासकीय सदस्य श्री, अनिल राठोड, कैलास चव्हाण, यांच्या सह समाजातील प्रतिनिधी उप- स्थित होते, या वेळी मा जिल्हाधिकारी महोदयानी दिलेल्या २८ मार्च या अंतिम तारखेच्या पूर्वी, परतूर तालुक्यातील सर्व प्रस्ताव तयार करून जिल्हा समितीकडे सादर करण्या संबंधी सूचना यावेळी गटविकास अधिकारी। परतूर यांनी सर्व संबंधीत अधिकारी कर्मचारी दिल्या आहेत

# गिग वर्कर, प्लॅटफॉर्म वर्कर व ॲग्रिगेटर यांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी- जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

ई-श्रम पोर्टलवर केंद्र शासनाने गिग व वर्कर, प्लॅटफॉर्म वर्कर व ॲग्रिगेटर यांची नोंदणी करण्यास सुरवात झाली आहे. सधारनताः गिग व प्लॅटफार्म वर्कर म्हणजे शेरिंग वाहन कामगार, अन्न व किराणा पुरवठा करणारे कामगार, लॉजिस्टीक सेवा देणारे कामगार आदि मार्केटमध्ये ऑनलाईन काम करणारे कामगार, प्रोफेशन सर्विस देणारे कामगार, हेल्थ केअर सेवा देणारे कामगार, ट्रॅव्हल व आदरातिथ्य करणारे कामगार, मिडिया सर्विसेस हे सर्व प्लॅटफॉर्म गिग वर्करच्या व्याख्येत येतात. अमॅझोन, फ्लीपकार्ट, मिंत्रा, स्नॅपडिल, अजिओ, मिशो, स्विगी, झोमॅटो अशा वेगवेगळ्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर काम करणारे कामगार हे सर्व ई श्रम eshram.gov.in वर नोंदित होवू शकतील व केंद्र सरकारकडे त्यांचा डेटा तयार होईल म्हणुन दि. १ एप्रिल २०२५ पासून सर्व गिग कामगारांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी. डिजिटल मध्यस्थी म्हणुन काम करणारे सर्व सेवा पुरवठादार यांनी ॲग्रिगेटर म्हणुन नोंदीत होणे आवश्यक असून सर्व ॲग्रिगेटर यांनी ३१ मार्च २०२५ रोजी पर्यंत register.eshram.gov.in//user/platform-worker-registration या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

# श्री संत नामदेवांच्या समाधी दर्शनासाठी भाविकांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मार्च**

श्री संत नामदेव महाराज यांचे जन्मस्थळ असलेल्या नर्सी नामदेव येथे आजपासून तीन दिवशीय धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि २६ मार्च रोजी श्री संत नामदेव महाराज यांच्या समाधी दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी सकाळपासूनच रांगा लावल्या होत्या.

तीन दिवशीय यात्रा महोत्सवाला आजपासून सुरूवात झाली असून सकाळी श्री संत नामदेव महाराज यांच्या समाधीची महापूजा नर्सी नामदेव पोलिस ठाण्याचे जमादार अशोक कळंबे यांचेहस्ते करण्यात आली. त्यानंतर उपनिरीक्षक जाधव यांचेहस्ते संत नामदेव महाराजांना कपड्यांचा आहेर करण्यात आला. यावेळी संस्थानचे उपाध्यक्ष भिकाजी किर्तनकार, विश्वस्त द्वारकादास सारडा, रमेश महाराज मगर यांच्यासह भाविकांची व पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

सकाळपासूनच पंचक्रोशीतील भाविकांनी संत नामदेव महाराज यांच्या समाधी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. उन्हाची तीव्रता पाहता संस्थानच्यावतीने मंडप उभारण्यात आला होता. आज परिसरातील २० गावातील दिंड्या नर्सीमध्ये दाखल झाल्या होत्या. उशिरापर्यंत जवळपास ६० हून अधिक दिंड्या संत नामदेव नगरीत दाखल होणार आहेत. संत नामदेव महाराजांचा गजर करीत वारकरी मंडळी मोठ्या भक्ती भावाने नर्सीत दाखल झाले असून यावेळी टाळ मृदंगाच्या गजराने संपूर्ण परिसर दणाणून गेल्याचे दिसत होते.

दि २७ मार्च रोजी दुपारी दोन वाजता संत नामदेव महाराज मंदिरापासून पालखी मिरवणूक काढली जाणार असून नगर प्रदक्षिणा घेतली जाणार आहे. या नगर प्रदक्षिणेचे एक वेगळेच महत्व असल्यामुळे नर्सी येथील सर्व जाती धर्माचे लोक या नगर प्रदक्षिणेमध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग घेतात. ही प्रदक्षिणा गावातील मुख्य मार्गावरून निघणार असून ठिकठिकाणी पालखीचे स्वागत करण्यात येते. त्यानंतर सायंकाळी सहा वाजता पालखी मिरवणूक संत नामदेव महाराज मंदिराजवळ विसर्जीत होणार आहे. रात्री नर्सीत दाखल झालेल्या दिंडीतील भाविकांचा सत्कार केला जाणार आहे. तर २८ मार्चला काल्याच्या किर्तनाने या तीन दिवशीय यात्रेचा समारोप होणार असून महाप्रसादचे आयोजनही करण्यात आले आहे.

# सद्भाव संस्था, जायंटस ग्रूपकडून पक्षांसाठी १० ठिकाणी पाणपोई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मार्च**

येथील सद्भाव सेवा संस्था आणि जायंटस ग्रुपच्यावतीने शहरातील विविध ठिकाणी पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून या ठिकाणी असलेल्या झाडांवर पिण्यासाठी पाण्याची भांडी लटकविण्यात आली आहेत.

शहरातील सद्भाव संस्था आणि जायंटस ग्रुपकडून सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेते. वृक्षलागवड, विविध शाळांमध्ये योग शिबीर, आरोग्याविषयी जनजागृती आदी उपक्रम राबवण्यात येत असतात. अशाच प्रकारे सध्या उन्हाचा पारा ३८ अंशावर पोहोचला असल्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत आहे. त्याअनुषंगाने सद्भाव संस्था आणि जायंटस ग्रुपच्यावतीने पक्षांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शहरात ज्या ठिकाणी झाडांवर मोठ्या संख्येने पक्षी थांबतात त्या १० ठिकाणांची निवड करून तेथील झाडांवर पाणपोई लटविण्यात आली आहे. जेणेकरून पक्षांना बिनदिक्कतपणे पिण्यासाठी पाणी उपलब्ध झाल्यानंतर पिता यावे. त्यासाठी टोपली, पसरट भांडे यांची निवड करण्यात आली असून ते झाडांच्या फाद्यांना विशिष्ट ठिकाणी विशिष्ट पध्दतीने बांधण्यात आले आहेत. या भांड्यात दररोज सकाळी आणि सायंकाळी पाणी रले जात आहे.

या उपक्रमाला पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी सुध्दा प्रतिसाद दिला असून पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरात असलेल्या सुमारे २० पेक्षा अधिक झाडांवर पाण्याची टोपली लटकविण्यात आली आहेत. या उपक्रमासाठी पोलिस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे, राखीव पोलिस दलाचे निरीक्षक भगवान जाधव, सद्भाव संस्थेचे अभयकुमार भरतीया, विनोद खरात, डॉ गणेश अवचार, रत्नाकर महाजन, हर्षवर्धन परसवाळे, नीळकंठ गायकवाड, संजय खिल्लारे, महेश शहाणे, जमादार जाधव, फोले आदी परिश्रम घेत आहेत. पुढील काळात याठिकाणी पक्षांसाठी खाद्यपदार्थही ठेवण्यात येणार असल्याचे भरतीया यांनी सांगितले.

नागरिकांनीही आपपल्या घराच्या परिसरात, झाडांवर घराच्या छतावर पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व धान्य ठेवावे, असे आवाहन सद्भाव संस्थाकडून करण्यात आले आहे.

# पैशाच्या वादातूनच उमरा येथील शेतकऱ्याचा खून पोलिसात गुन्हा दाखल, एका आरोपीला अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मार्च**

कळमनुरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोरील ढाब्याच्या बाजूस पैशाच्या वादातूनच उमरा येथील शेतकऱ्याचा खून झाल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले असून याप्रकरणी कळमनुरी पोलिस ठाण्यात मंगळवारी गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी एकाला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार कळमनुरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोरील दुकानाच्या बाजूस एका ढाब्याजवळ मंगळवार दि २५ मार्च रोजी एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी आंबादास भुसारे, पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अधिक चौकशीमध्ये सदर मृतदेह ग्यानबाराव वडकुते यांचा असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यावरून पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपीची माहीती घेण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यानंतर या प्रकरणात गणपतसिंह टाक रा कळमनुरी याचा हात असल्याची माहीती मिळाल्यावरून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्या प्राथमिक चौकशीत त्यानेच पैशाच्या कारणावरून ग्यानबाराव याचा खून केल्याचे स्पष्ट झाले आहे.

याप्रकरणी मीराबाई वडकुते यांनी दिलेल्या तक्रारीवरून कळमनुरी पोलिस ठाण्यात गणपतसिंह टाक याच्याविरूध्द खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आणखी पुरावे गोळा करण्यासाठी प्रयत्न सुरू केले असून यामध्ये आणखी काहीजणांचा समावेश असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.




**हिंगोली– कृषी विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पौष्टीक तृणधान्य महोत्साचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी सहसंचालक साहेबराव दिवेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, कृषी अधीक्षक राजेंद्र कदम आदींची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### गिग वर्कर, प्लॅटफॉर्म वर्कर, ग्रीगेटर यांनी ई–श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

हिंगोली– ई–श्रम पोर्टलवर केंद्र शासनाने गिग वर्कर, प्लॅटफॉर्म वर्कर व ग्रिगेटर यांची नोंदणी करण्यास सुरुवात केली आहे. साधारणत: गिग व प्लॅटफॉर्म वर्कर यांनी ई –श्रम पोर्टलवर त्यांची नावनोंदणी करण्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आवाहन केले आहे. यामध्ये शेरींग वाहन कामगार, अन्न व किराणा पुरवठा करणारे कामगार, लॉजिस्टीक सेवा देणारे कामगार इत्यादी मार्केटमध्ये ऑनलाईन काम करणारे कामगार, प्रोफेशनल सर्विस देणारे कामगार, हेल्थ केअर सेवा देणारे कामगार, ट्रॅव्हल व आदरातिथ्य करणारे कामगार, मिडिया सर्विसेस इत्यादी सर्व प्लॅटफार्म गिग वर्करच्या व्याख्येत येतात. मेझान, फ्लीपकार्ट, मित्रा, स्नॅपडिल, आजिओ, मिशो, स्वीगी, झोमॅटो अशा वेगवेगळ्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर काम करणारे कामगार हे सर्व नोंदीत होऊ शकतील. केंद्र सरकारकडे त्यांचा डेटा तयार होईल. त्यासाठी दि. ०१ एप्रिल, २०२५ पासून सर्व गिग कामगारांनी ई–श्रम पोर्टलवर नोंदणी करावी. तसेच डिजिटल मध्यस्थी म्हणून काम करणारे सर्व सेवा पुरवठादार यांनी ग्रिगेटर म्हणून नोंदीत होणे आवश्यक आहे. सर्व ग्रिगेटर यांनी दि. ३१ मार्च, २०२५ पर्यंत साईटवर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी केले आहे.

### सांदीपनीचे आंतरराष्ट्रीय गणित स्पर्धेत यश



हिंगोली– सुनील नगर, तरोडा (बु.), नांदेड येथील सांदीपनी पब्लिक स्कूलने एका आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या यशाची नोंद केली आहे. सायन्स ऑलिंपियाड फाऊंडेशन आयोजित आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाड परीक्षा डिसेंबर महिन्यात आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेत महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. घोषित करण्यात आलेल्या निकालांमध्ये सांदीपनी पब्लिक स्कूलच्या २५३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, त्यापैकी २९ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक मिळाले. या अचूक यशामुळे शाळेचा गौरव वाढला असून, शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले व सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

### ६६ वाहन चालकांवर कार्यवाही

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६६ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कार्यवाही करीत ५२२५० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# हिंगोली जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी अंजली रमेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मार्च**

हिंगोली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी अंजली रमेश यांची नियुक्त करण्यात आली असून त्यांच्या बदलीचे आदेश शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या मुख्य सचिव व्ही. राधा यांनी मंगळवार दि २५ मार्च रोजी काढले आहेत.

हिंगोली जिल्हा परिषदेत मागील आठ महिन्यांपूर्वी रूजू झालेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी जिल्हा परिषदेच्या कारभारात चांगलीच सुधारणा केली होती. विशेषत: जिल्ह्यातील शिक्षण व्यवस्था आणि आरोग्य सेवेवर त्यांचा अधिक भर होता. ग्रामीण भागातील रूग्णांना आरोग्य सेवा मिळाली पाहीजे यासाठी त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रांना सरप्राईज व्हीजीट देऊन तपासणी सुरू केली होती. याशिवाय जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्यासोबत निपूण उपक्रमांतर्गत शिक्षण व्यवस्थेत बदल घडविण्यासाठी प्रयत्न केले. कमी गुणवत्ता असलेल्या जिल्हा परिषद शाळांना भेटी दिल्या. तसेच कमी गुणवत्ता असलेल्या शाळांमधील शिक्षकांवर कार्यवाहीचा धडाका लावला होता. त्यात तीन शिक्षकांवर निलंबनाची कार्यवाही केली होती.

दि २५ मार्च रोजी मध्यप्रदेश संवर्गातून महाराष्ट्रात रूजू झालेल्या अंजली रमेश यांची हिंगोली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती झाली आहे. त्यांच्या बदलीचे आदेश काढण्यात आले आहेत. अंजली रमेश यांनी अहमदाबाद येथून एमबीएचे शिक्षण पूर्ण केले असून त्यानंतर त्यांनी आयआयटी मद्रास येथून बीटेक आणि एमटेक पूर्ण केले आहे. मध्यप्रदेश राज्यात त्यांनी उपविभागीय अधिकारी, सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून काम पाहीले आहे. त्यानंतर त्या मध्यप्रदेश संवर्गातून महाराष्ट्र शासनाकडे रूजू झाल्या आहेत. पुढील आठवड्यात त्या हिंगोलीत रूजू होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाचे काम कौतुकास्पद– जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मार्च**

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाने एड्स आजाराला प्रतिबंध घालण्यासाठी विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबवून कौतुकास्पद कामगिरी केली असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीची त्रैमासिक आढावा बैठक जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग फोपसे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. आर. मगर, जिल्हा माहिति अधिकारी प्रभाकर बारहाते, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश कोठूळे, जिल्हा सरकारी कामगार विभागाचे ढगे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राजू एडके, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक शंकर तावडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी ज्ञानेश्वर चौधरी, विहानच्या श्रीमती अलका रणवीर, सेतूचे इरफान कुरेशी, श्रीमती पुंडगे, श्रीमती पाईकराव, 'डापकू'चे संजय पवार, श्रीमती टिना कुंदनाणी, आशिष पाटील आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गोयल म्हणाले, सध्या रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या विविध विभागामार्फत रक्तदान शिबिराचे आयोजन करुन पुरेसा रक्तसाठा तयार ठेवावा, यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नियोजन करावे. सर्व गरोदर माताची नियमित एचआयव्ही व गुप्तरोग तपासणी करावी. तसेच हिपॅटायटीसचे लसीकरण सर्व अती जोखीम गटातील व्यक्तींना करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी पुरेसा लशींचा साठा व एचआयव्ही आणि एसटीआय किट उपलब्ध ठेवण्यास सांगितले. तसेच एआरटी सेंटर येथे शिबिराचे आयोजन करुन एचआयव्ही संसर्गित रुग्णांचे आयुष्यमान भारत कार्ड काढावेत, अशा सूचनाही गोयल यांनी यावेळी केल्या. जिल्हा कार्यक्रम अधिकारी ज्ञानेश्वर चौधरी यांनी जिल्ह्यातील एचआयव्ही, एड्स कार्यक्रमाच्या कामाचा अहवाल सादर यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तर चौधरी यांनी आभार मानले.

# हिंगोलीत जिजाऊ रथयात्रा स्वागतासाठी नियोजन बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मार्च**

मराठा सेवा संघाव्द्रारे जिजाऊ रथयात्रा २०२५ मराठा जोडो अभियान हे वेरूळ येथुन प्रारंभ होऊन संपुर्ण महाराष्ट्रात ४५ दिवस भ्रमण करून लाल महाल पुणे येथे समापन करण्यात येणार असुन हिंगोली जिल्हयात आगमन झाल्यानंतर स्वागतासाठी नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले.

जिजाऊ रथयात्रेचे हिंगोली जिल्ह्यात ४ एप्रील रोजी आगमन होऊन पुढे सेनगाव, नर्सी नामदेव वरून हिंगोली शहरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर भ्रमण करून ५ एप्रील हिंगोली वरून सकाळी ९ वाजता निघुन १० वाजता कळमनूरी नंतर आखाडा बाळापुर, सिंदगी, कूंरुदा, वसमत मार्ग नांदेड जिल्ह्यात दाखल होणार आहे. दिनांक ४ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता जिजाऊ रथयात्रेचे भव्य मिरवणूक व त्यानंतर हिंगोली येथील महात्मा गांधी चौकात भव्य सभा संपन्न होणार आहे. या सभेमध्ये सामाजिक सलोखा राखण्याच्या दृष्टिकोनातून सर्व समाजातील बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव ढोकर पाटील, खंडेराव सरनाईक,कल्याणदेशमुख, गजानन मगर, नामदेव कोरडे, पंडित अवचार, माधव जाधव, सुधाकर बल्लाळ, नितीन इंगळे आदीसह मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेडचे सदस्य बैठकीस उपस्थित होते.

# लोहगाव जि.प. शाळेत पुरस्कार वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मार्च**

तालुक्यातील जि प प्रा शा लोहगाव येथे तंबाखूमुक्त शाळांच्या बाल परिषदेत उत्कृष्ट सहभाग नोंदवल्याबद्दल तसेच राज्यस्तरीय ऋतुरंग चित्रकला स्पर्धेत विविध पुरस्कार मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

तंबाखू मुक्त शाळांच्या बालपरिषदेत जि प प्रा शा लोहगावचे उपक्रमशील शिक्षक तथा तंबाखू शाळांचे समन्वयक दिलीप धामणे यांच्या मार्गदर्शनाखाली कु. अक्षरा देविदास मगर, कु. सिद्धी संतोष राऊत, कु. वैष्णवी नामदेव राखुंडे, कु. लावण्या संतोष गव्हाणकर, कु. खुशी परमेश्वर खिल्लारे या पाच विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सहभाग नोंदवला होता. या सर्वांना डिग्रस केंद्राचे केंद्रप्रमुख जे. एस. कऱ्हाळे यांचे हस्ते सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे ऋतुरंग राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत कु. वैष्णवी गजानन हाके, कु राधिका प्रकाश लाटे, कु शारदा दामोदर कदम, कु वैष्णवी संतोष सावळे, कु लक्ष्मी कृष्णाजी कपाटे या विद्यार्थिनींना तसेच मार्गदर्शक शिक्षक दिलीप धामणे सन्मान चिन्ह देऊन केंद्रप्रमुखांनी सन्मानित केले. शाळेतील सहभागी सर्व २०७ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला मुख्याध्यापक तनपुरे, अंभोरे, देवकते, आर डी कऱ्हाळे, धुमाळ, मुटकुळे, श्रीमती सूर्यवंशी, श्रीमती देवकते, श्रीमती वाढोणकर उपस्थित होते.

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात

# जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या ई -ऑफिस प्रणालीला दुसरा क्रमांक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ मार्च-**

वर्धा येथे जिल्हाधिकारी असताना राहुल कर्डिले यांनी संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील महसूल विभागात राबविलेल्या ई - ऑफिस प्रणालीची दखल राज्य शासनाने घेतली आहे. २०२४-२५ च्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात या उल्लेखनीय कार्याला पुरस्कृत करण्यात आले असून राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

नवीन तंत्रज्ञानामुळे प्रशासनाच्या कामात नवनवीन बदल करणे आवश्यक ठरते. वर्ध्याचे तत्कालिन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्हाधिकारी वर्धा कार्यालयात ई-ऑफिस प्रणाली सन २०२३-२४ मध्ये यशस्वीरित्या राबविली. यामुळे प्रशासकीय कामकाजात सुलभता आली. या उल्लेखनिय कार्याची दखल घेवून राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियान २०२३-२४ स्पर्धेत वर्ध्याचे तत्कालिन जिल्हाधिकारी व आताचे नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या कार्य कर्तृत्वाला द्वितीय पारितोषिक जाहिर झाले आहे.



विभागीय स्तरावरील निवड समित्यांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांच्या गटामध्ये ही निवड करण्यात आली आहे. वर्धा जिल्ह्याच्या तालुकास्तरावर देखील त्यांनी ई -ऑफिस प्रणाली सुरू केली होती. त्यामुळे फायलींचा पसारा कमी करण्यात मदत झाली. नांदेडमध्येही त्यांनी या अभियानाला सुरुवात केली आहे.

संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील महसूल विभागात ई-ऑफिस प्रणाली राबविण्याबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना ६ लक्ष रुपयांचे द्वितीय राज्यस्तरीय पारितोषिक शासनाच्यावतीने जाहीर झाले आहे. महसूली विभागातील बदलत्या नवीन तंत्रज्ञानामुळे व जागतिकरणामुळे प्रशासनाच्यामध्ये मोठया प्रमाणात बदल करणे आवश्यक असते. त्यानुसार प्रशासनातील सेवांच्या गुणवत्तेत वाढ, लोकाभिमुखता व निर्णयशिलता आणण्यासाठी तसेच सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्यासाठी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियान व स्पर्धा आयोजित केली जाते.

या गटात अवैध गौन खनिज उत्पादन आणि वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याकरिता केलेल्या प्रयोगासाठी अहिल्यानगरला प्रथम पुरस्कार. तर नगर परिषद कार्यालयाकरिता सोलार प्रकल्प कार्यान्वित केल्या प्रकरणी लातूर जिल्ह्यातील निलंगा नगर परिषदेला तृतीय पुरस्कार मिळाला आहे.

# मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्याशी सुर्यवंशी यांची पाणीपुरवठा संदर्भाने चर्चा

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २६ मार्च-**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्याशी माजी नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी यांची विकास कामा संदर्भात मुंबई येथे शहरा विकासाच्या व आगामी नगर पालिका निवडणुकीच्या संदर्भाने सखोलपणे चर्चा केली. शहरासाठी कायम पाणी पुरवठा योजना मंजुर झाली परंतु मुदत संपली असुन गुत्तेदार संथगतीने काम करत आहे. शहरातील विकास कामा संदर्भात लेखाजोखा मांडून,वाढत्या शहराला कोणी खिळ घालण्याचे प्रयत्न सुरु असुन या संदर्भात राज्याचे महसूलमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्याशी चर्चा करुन शहरात केलेला विकास कामे, विकासात घातलेले कारनामे यांचे पुरावे सादर केले.

लोहा शहर इतर तालुक्याच्या तुलनेत वाढते शहर म्हणुन ओळख झाली आहे. इतर तालुक्याच्या दृष्टीने विचार केला तर हे शहर सोईचे आहे या ठिकाणावरुन नांदेड,परभणी,लातुर तेलंगण राज्या अगदी जवळच्या अंतरावर आहेत. अनेक कुंटुबाला आगामी काळातील सोईचे ठिकाण ठरेल आसे भाकित वाटत आहे. शहरातुन राष्ट्रीय ३६१ नागपूर तुळजापुर राष्ट्रीय महामार्गावर गेला आहे.आणी हे शहर राष्ट्रीय महामार्गावर बसलेले आहे. आता शहरातुन वैद्यकीय उपचारासाठी मोठ्या शहरात जाण्याची गरज भासणार नाही कारण या शहारात प्राथमिक शिक्षण घेतलेले विद्यार्थीच वैद्यकीय उच्च शिक्षण घेऊन या शहरात आधुनिक वैद्यकीय सेवा करत आहे. शहराच्या मागील काळात शासकीय रुग्णालयासह खाजगी तीन चार वैद्यकीय सेवा देणारे वैद्यकीय हॉस्पिटल होते, पण आजच्या घडीला साठ ते सत्तार उच्च शिक्षित भव्य हॉस्पीटलची उभारणी करुन वैद्यकीय सेवा करत आहेत आणी आजुन काही वैद्यकीय उच्च शिक्षित



विद्यार्थ्याने भु.खंड खरेदी करुन दर्जादार हॉस्पिटलची उभारणी करण्याच्या बेतात आहेत. शहरात दरर्जेदार शिक्षण मिळत नाही म्हणुन लोहा येथून नांदेड,अहमदपूरला व खाजगी शिकवणीला १५ ते २० स्कुल भरुन दररोज विद्यार्थी ये..जा करत होते पण आता या शहरातुन जाण्याची गरज नाही कारण सि.बी.एस.सी कोर्स सरकारने आता लागु करण्याचे धोरण आहे पण या पुर्वीच या शहरातील शाळेत या कोर्सला सुरुवात केली. यामध्ये नारायणा इंटरनॅशनल स्कुल, सह्याद्री इंग्लीश स्कूल ,ग्लोबल इंग्लीश स्कुल,डी.के.पाटील प्राथमिक माध्यमिक शाळा, पायोनियर इंग्रजी शाळा या ठिकाणी पुर्वीपासुन सि.बी.एस.सी. पॉटर्न शिकवला जात होते.शैक्षणीक दृष्ट्या शहर प्रगतीवर आहे. वैद्यकीय शिक्षणापासुन ते व्यवसायीकाचे दालन आहेत. नांदेडच्या खाजगी कोचिंग क्लासेसवाल्याने यावर्षीपासुन शहरात शिकवणी वर्गाला सुरुवात केली आहे.

.शेतकऱ्याच्या हिताची कृर्षी बाजार पेठ आहे.यामुळे प्रतेक कुटुंबाला या शहरात स्थायिक होणे सोपे वाटत आहे पण शहराच्या विकासात खिळ घातली शहराचा विकास रुतला. शहरातील विकासाचा लेखाजोखाची मांडणी करुन सादर केला. येणाऱ्या काळातील आगामी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकत मार्ग सोपे कसे राहातील या विषयी मुंबई ये जाऊन सविस्तर चर्चा केली.

## संक्षिप्त वृत्त

### उपमूख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बद्दल केलेल्या वक्तव्याचा भोकरमध्ये निषेध

**भोकर**-शिवसेनेचे मूख्यनेते तथा राज्याचे उपमूख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे बद्दल आक्षेपार्ह व्यक्तव्य केल्याबद्यल भोकर तालूका



शिवसेना(शिंदेगट) या वक्तव्याचा जाहिर निषेध करुन असे वक्तव्य करणाऱ्या कूणाल कामरा यांचेविरुध्द कठोरात कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी शिवसेना तालुका प्रमुख अमोल पवार यांनी केली आहे. कुणाल कामरा यास तात्काळ अटक करावी कारण त्यांच्या वक्तव्याने महाराष्ट्रात कायदा व सूव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो कूणाल कामरा यांचेवर त्वरीत गून्हा दाखल करावा असेही निवेदनात नुद करण्यात आले आहे. या निवेदनावर निवेदनावर शिवसेना तालूका प्रमूख अमोल धनराज पवार, शहराध्यक्ष अजय टाक, कृष्ण पाटील कोंडलवार, माधव करेवाड, शाम वानखेडे, निखील डूरे, महेंद्र किनीकर आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### विजयकुमार बेंबडे उत्कृष्ट मराठी अध्यापन सेवा कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित



**नांदेड**-सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल, मुदखेड जि. नांदेड येथील मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन सेवा कार्य गौरव पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले आहे. ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, टाकळीभान ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर यांच्या वतीने मराठी भाषेच्या निरंतर सेवा, प्रचार-प्रसार व संशोधन कार्यासाठीच्या अनमोल योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार नुकताच मराठी साहित्यविश्वातील प्रसिद्ध कवी, समीक्षक डॉ.केशव सखाराम देशमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, रेखाताई भांडारे (ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या मानसकन्या), आ. हेमंत उगले, डॉ. वंदनाताई मुरकुटे, अर्जुन राऊत आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत टाकळीभान येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

### आदर्श पोलीस पाटील म्हणून व्यंकटराव गोपनर यांचा सन्मान

**मुक्रमाबाद, दि. २६ मार्च-** २००१ पासून आजतागायतपर्यंत मौजे बामणी येथे व्यकटराव पाटील बामणीकर पोलीस पाटील म्हणून



कार्यरत असून येथील अनेक छोटे मोठे गुन्हे गावातीलच पंचासमक्ष वाद मिटून गावात सलोखा व कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याचे कामे व्यंकटराव पाटील यांनी केले. तसेच गावात मौजे बामणी येथे अनेक सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या गावात पोलिस पाटील व्यंकटराव पाटील यांनी अनेक सामाजिक उपक्रम, व विविध शासकीय योजनांची माहिती देऊन गावातील अनेक तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध करून शासकीय माहिती देण्याचे काम पोलीस पाटील या नात्याने पार पाडण्याचे काम व्यंकटराव पाटील यानी केले. अनेक कामाच्या संदर्भात मौजे बामणी गावाचे नाव जिल्हय़ात नावलौकिक केले. याचीच दखल घेऊन विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र व पोलिस अधीक्षक तसेच देगलुरचे उपविभागीय पोलीस अधिकारी तथा मुक्रमाबाद शहराचे सपोनि भालचंद्र तिडके यांच्या हस्ते बामणी येथील पोलीस पाटील व्यंकटराव पाटील यांना प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बामणी येथील ग्रामसुरक्षा दल शिवकुमार मुगदाळे, दस्तगीर शेख, कैलास जाधव, हणमंत गोपनर, गोविंद शिंदे, संतोष भायकाटे, शिवसेनेचे मन्मथ खंकरे यांच्यासह अनेकानी अभिनंदन केले.

### अशोक नगर येथे तायक्वांदो कोरियन कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**नांदेड**-केंद्र शासनाच्या युवा व खेळ मंत्रालय अंतर्गत नांदेड जिल्हा तायक्वॉदो संघटनेच्या वतीने १ एप्रिल ते ३० एप्रिल२०२५ दरम्यान मास्टर तायक्वांदो मार्शल आर्ट स्कूल अशोक नगर नांदेड येथे एका महिन्याचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून त्याचा नांदेड मधील विद्यार्थी युवक युवतीने लाभ घेण्याचे आयोजन संघटनेतर्फे करण्यात आले आहे . ऑलम्पिक मध्ये खेळला जाणारा तसेच जगभरातील सर्व संरक्षण दलासह भारतात सर्व विभागात नोकरी आरक्षणात असणारा सर्वोत्तम संरक्षण खेळ प्रकार तायक्वांदोचे प्रशिक्षण आंतरराष्ट्रीय प्रशिक्षकांच्या माध्यमातून विविध चार बॅचेस मध्ये देण्यात येणार आहे स्वसंरक्षणासह शालेय , जिल्हा , राज्य ,राष्ट्रीय स्पर्धेत तसेच सीबीएससी स्पर्धेत ,ऑलम्पिक ट्रायल स्पर्धेत ,खेलो इंडिया स्पर्धेसह तायक्वॉदो पोलीस स्पर्धा ऑल इंडिया इंटर यूनिवर्सिटी स्पर्धेत सहभाग नोंदवीत असे आवाहन करण्यात आले आहे .

# साधने पुरवठा योजनेतील लाभार्थ्यांची लॉटरी पध्दतीने निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ मार्च-**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याबाबत योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ८ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे.

या योजनेसाठी पात्र बचतगटांनी सन २०२३-२४ साठी http://mini.mahasamajkalyan.in/ या संकेतस्थळावर लाभार्थ्यांचे ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात आले होते. या योजनेअंतर्गत पात्र झालेल्या बचतगटांची संख्या उपलब्ध तरतुदीच्या अनुषंगाने अर्जदारांची संख्या जास्त असल्यामुळे लाभार्थ्यांची निवड लॉटरी पध्दतीने उद्या २७ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नांदेड येथील सभागृहामध्ये करण्यात येणार आहे. तरी लॉटरी पध्दतीने निवड करण्यासाठी पात्र अर्जदारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

# धर्मादाय कार्यालयाकडून ८ हजार प्रकरणाचा निपटारा: सहआयुक्त हिरा शेळके



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ मार्च-**

गेल्या एक वर्षात नांदेड धर्मादाय कार्यालयाने विविध नाविन्यपूर्ण न्यायीक काम करताना ८ हजार ६६५ प्रकरणांचा नपटारा केल्याची माहिती धर्मादाय सह आयुक्त हिरा का.शेळके यांनी विश्वस्तांच्या कार्यशाळेत दिली.

राज्यातील महायुती शासनाने १०० दिवसांचा कृती आराखडा संकल्पनेतून नांदेड येथील धर्मादाय सह आयुक्त कार्यालयाच्यावतीने शहरातील वसंतनगर येथील प्रगती महिलामंडळाच्या सभागृहात विश्वस्तांच्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यावेळी त्या कार्यशाळेच्या अध्यक्षपदावरुन बोलत होत्या. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन माजी मंत्री डी. पी. सावंत हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड धर्मादाय सह आयुक्त हिरा का. शेळके होत्या. या कार्यशाळेत धर्मादाय उप आयुक्त, नांदेड ममता यो.राखडे यांनी धर्मादाय रुग्णालयाशी संबंधित कायदेशीर व रुग्णांना उपयोगी अशी माहीती दिली. सहायक धर्मादाय आयुक्त परभणी श्रीमती पानसरे यांनी विश्वस्तांना नेहमी उपयोगी पडणारे न्यासाच्या विविध प्रकारच्या बदल अर्ज/फेरफार अर्जाविषयी अतिशय सुलभ भाषेत माहीती दिली. याचप्रमाणे सदरच्या कार्यशाळेत सनदी लेखापाल रविंद्र भारतीय यांनी न्यासांना करावे लागणारे ऑडीट रिपोर्ट त्यामधील विविध बारकावे त्यांच्या पध्दती यांच्याविषयी उहापोह केला. तर शेवटी नांदेड धर्मादाय कार्यालयातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. मुकूंद चौधरी यांनी न्यासांनी कर्ज घेणेकरिता घ्यावी लागणारी दक्षता व त्यासंबंधीत कागदपत्रे याविषयीची कायदेशीर बाजूची मांडणी केली. या कार्यशाळेचे सुंदर सुत्रसंचालन सहायक धर्मादाय आयुक्त नांदेड वैशाली वि.चौधरी यांनी केली. कार्यशाळेचे प्रास्ताविक ॲड. बी. जी. मोरे तर आभारप्रदर्शन ॲड. विलास भोसले यांनी केली आहे. धर्मादाय सह आयुक्त,नांदेड श्री हिरा का. शेळके यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात धर्मादाय कार्यालय, नांदेड कडुन मागील एका वर्षात केलेल्या विविध नाविन्यपूर्ण कामे व न्यायीक कामांचा उहापोह केला. मागील एका वर्षात एकुण ८७६५ प्रकरणांचा निपटारा या कार्यालयाकडुन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यशाळेस उत्स्फुर्तपणे उपस्थीत अनेक विश्वस्तांपैकी काहींनी तेथे उपस्थीत न्यायीक अधिकारी, सनदी लेखापाल आणि ज्येष्ठ विधिज्ञ यांच्या प्राश्नीक स्वरुपात सुसंवाद देखील साधला.या विश्वस्तांच्या कार्यशाळेस नांदेड, परभणी व हिंगोली येथील विधिज्ञ आणि शेकडो विश्वस्तांनी उपस्थीती राहुन न्यासाशी संबंधीत कायदेशीर ज्ञानाची मेजवानी लुटली.

## लसाकम जिल्हा बैठक

**नांदेड**-परभणी येथील समाजाच्या मुलीवर बलात्कार व अन्याय करणाऱ्या नराधमांस कठोर शासन करण्यात यावे अशी मागणी लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब केली असुन नांदेड जिल्हा लसाकमने या घटनेचा निषेध केला आहे .राज्यात समाजावर मोठ्या प्रमाणात अन्याय होत असल्याने शासनाने या गंभीर बाबीकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे मत लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी व्यक्त केले आहे. यासाठी मुख्यमंत्र्यांना लवकरच लसाकम विविध मागण्याचे निवेदन देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# छावाच्या वतीने प्राचार्य लक्ष्मीकांत तांबोळी यांचा सत्कार

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २६ मार्च-**

गोदाकाठच्या नांदेड येथील साहित्यकाला गुजरातच्या कवी नर्मद पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. गुजरात राज्याचे राज्यगीत लिहिणारे कवी नर्मद यांच्या नावाने असलेला गुजराती साहित्य अकादमीचा कवी नर्मद हा पुरस्कार नांदेड येथील ज्येष्ठ कवी तथा मराठवाडा गौरव गीत लिहिणारे प्रा.लक्ष्मीकांत तांबोळी यांना प्रदान करण्यात आला आहे. सदर पुरस्काराचे वितरण मुंबई येथे रवींद्र नाट्यमंदिरात संपन्न झाले आहे. प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी यांनी मराठी भाषेवर निस्सीम प्रेम करत मागील सहा दशकापासून

कथा, कविता, कादंबरी व ललित लिखाणातून मराठी साहित्यात आपला स्वतंत्र ठसा निर्माण केला आहे. त्यांच्या या साहित्याची दखल घेत गुजरातचे कवी नर्मद यांच्या नावाने



पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्काराचा मुख्य उद्देश म्हणजे कवी लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या काही कविता गुजराती भाषेत अनुवादित झालेल्या आहेत. तर काही कविता गुजरात राज्याच्या शालेय अभ्यासक्रमातही समाविष्ट करण्यात आले आहेत. मराठी साहित्यातील दर्जेदार वाङ्मयाने आपले योगदान देणाऱ्या प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी यांना गुजराती साहित्य अकादमीने कवी नर्मद पुरस्कार प्राप्त होणे म्हणजे एक प्रकारे नर्मदेने गोदावरीचा म्हणजेच नांदेडचा सन्मान केला आहे. या पुरस्कारा बद्दल छावा परिवाराच्या वतीने येथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी छावा मराठा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर, प्रा. डॉ. प्रभाकर जाधव, इंजि. प्रवीण जाधव, शिवानंद पाटील, अजित साबळे यांची उपस्थिति होती.

## विद्यापीठामध्ये 'यंत्रप्रेथॉन २०२५' इनोव्हेशन

**नांदेड** '-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य विभागातर्फे दि. २७ मार्च रोजी 'यंत्रप्रेथॉन २०२५' या भव्य स्टार्टअप हॅकाथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, प्रमुख पाहुणे नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन २७ मार्च रोजी होणार आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्व्हेक्षणाचा लाभ घ्यावा: खा. रविंद्र चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ मार्च-**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत पात्र कुटुंबांच्या सर्व्हेक्षणाची प्रक्रिया येत्या १ एप्रिल २०२५ पासून ग्रामपंचायतीच्या मदतीने सुरु होत आहे. या योजनेपासून नांदेड जिल्ह्यातील एकही पात्र लाभार्थी वंचित राहता कामा नये, यासाठी लाभार्थ्यांनी संबंधित ग्रामपंचायतीशी तात्काळ संपर्क साधावा आणि या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी केले आहे.



प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आवास प्लस सर्व्हेक्षण २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट न झालेले, प्रक्रियेद्वारे अपात्र ठरलेले परंतु सद्यस्थितीत पात्र असलेल्या कुटुंबांचे योजनेच्या या दुसऱ्या टप्प्यात नव्याने सर्व्हेक्षण करण्याच्या सूचना केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने राज्य सरकारला दिल्या आहेत. त्यानुसार मोबाईल ॲपमध्ये सर्व्हेक्षण करण्यासाठी सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी यांच्यावर सर्वेक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आलेली आहे. नांदेड जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळविण्याची पुन्हा एकदा संधी मिळाली असून येत्या १ एप्रिलपासून ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या मदतीने सर्व्हेक्षणाची प्रक्रिया सुरु होणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत पहिल्या टप्प्यात वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांसह नवीन लाभार्थ्यांनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन खा.रवींद्र चव्हाण यांनी केले आहे.

**प्रशासनालाही सूचना**

प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील सर्व्हेक्षण प्रक्रियेत नांदेड जिल्ह्यातील गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी तसेच जिल्ह्यात या योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये, यासाठी प्रशासनातील संबंधित वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांचेही कर्तव्य असून ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व सुलभतेने राबवावी, अशी सूचना खा.रवींद्र चव्हाण यांनी केली आहे.

# जिल्हा मध्यवर्ती कारागृहात देशभक्तीपर कार्यक्रमाची रंगत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ मार्च-**

नांदेड जिल्हा कारागृहामध्ये जीवन गाणे गातच जावे या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बंदिवानांमधील काही कलाकारांनी देखील या कार्यक्रमात भाग घेऊन देशभक्ती, सामाजिक एकोपा आणि राष्ट्रभक्तांवर आधारित गायन स्पर्धेमध्ये भाग घेऊन कार्यक्रमाची रंगत वाढवली.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व गृह विभागाच्या अप्पर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारणे सेवा यांच्या विशेष सहकार्याने २५ मार्चला नांदेड जिल्हा कारागृहामध्ये हा कार्यक्रम रंगला. राज्याच्या सांस्कृतिक विभागामार्फत निर्धारित केल्याप्रमाणे एकाच दिवशी ३६ कारागृहात एकाच वेळी या कार्यक्रमाला सुरुवात झाली.

नांदेड जिल्हा कारागृहामध्ये अधीक्षक एस. एच.आढे, जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, कारागृहाचे तुरुंग अधिकारी विजय मेश्राम, रूकमे, तसेच गायक रंजीत भद्रे व त्यांच्या संचाच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमांमध्ये देशभक्तीपर कार्यक्रम गीतांसोबतच, महापुरुषांच्या संदर्भातील गीते तसेच अनेक लोकप्रिय गाण्यांचे गायन सांस्कृतिक विभागामार्फत पाठविण्यात आलेल्या संचाने केले.

मात्र प्रमुख आकर्षण ठरले ते बंदीवानांपैकी अनेकांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन रॅप पासून तर भजनापर्यंत आणि कविता वाचनापासून तबलावादनापर्यंत कार्यक्रमात भाग घेऊन आपल्या नियमित रोजच्या बंदीवानाच्या जीवनातून काही निवांत क्षण घालवले. यावेळी अशा कार्यक्रमाचा आनंद झाल्याचे बंदीवानानी यावेळी आपल्या प्रतिक्रिया देताना सांगितले.

# गुढीपाडव्याला ११ किंवा २१ तरुण जोडप्यांच्या हस्ते पूजन करून भगवाध्वज लावा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २६ मार्च-**

गुढीपाडवा या दिवसापासून हिंदूधार्मियांच्या नवीन वर्षाला प्रारंभ होतो. त्यामुळे येत्या गुढीपाडव्याला म्हणजे ३० मार्च रोजी सर्व मंदिरांनी धार्मिक नेतृत्व स्वीकारून विविध समाजातील ११ किंवा २१ जोडप्यांच्या हस्ते पूजन करून मंदिरावर भगवा ध्वज उभारावा असे आवाहन विश्व हिंदू परिषद मंदिर आणि अर्चक पुरोहित आयाम किनवट यांनी एका जाहीर परिषदे पत्रकाद्वारे केले आहे.



हिंदू धर्माप्रमाणे नवीन वर्षे एक जानेवारी नसून गुढीपाडवा हे आहे.येत्या ३० मार्च २०२५ रोजी गुढीपाडवा असून युगाब्ध ५१२७ आहे. या दिवसापासून हिंदू धर्मियांच्या नवीन वर्षाला प्रारंभ होतो. त्यामुळे या दिवशी सर्व मंदिरांनी धार्मिक नेतृत्व स्वीकारून नियमित येणाऱ्या भक्तांना त्यांच्या घरावर लावण्यासाठी १०० ते ५०० भगव्या ध्वजाचे वितरण करावे. गुढीपाडव्याच्या दिवशी मंदिराने मोठाध्वज परिसरातील विविध समाजातील ११ किंवा २१ तरुण जोडप्यांचे हस्ते पूजन करून नंतर मंदिरावर लावावा. मंदिर परिसरात एक छोटीशी शोभायात्रा काढावी तसेच मंदिराच्या परिसरातील एखाद्या गरीब वस्तीमध्ये मिठाईवाटप करावे असे आवाहन विश्व हिंदू परिषदचे जिल्हा मंत्री संतोष रायेवार व मंदिर आर्य पुरोहित आयामचे जिल्हाप्रमुख रमेशचंद्र दारमवार यांनी सर्व मंदिर संस्थांनचे अध्यक्ष व सचिव यांना केले असून तसे प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे.

**विश्व हिंदू परिषदेचे मंदिर संस्थांना आवाहन**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# भागवत एकादशी निमित्त परळी वैद्यनाथ मंदिरात भाविकांची मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२६ मार्च**



भागवत एकादशीच्या पावन पर्वानिमित्त परळीतील पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिरात भाविकांच्या अलोट गर्दीने भक्तिमय वातावरण निर्माण झाले. महाराष्ट्रासह विविध राज्यांतील हजारो भक्तांनी मंदिरात हजेरी लावत भगवान वैद्यनाथाच्या चरणी नतमस्तक होऊन दर्शनाचा लाभ घेतला.

बुधवारच्या पवित्र दिवशी पहाटेपासूनच मंदिर परिसरात भक्तांची रिघ लागली होती. गाभाऱ्यातील भगवान वैद्यनाथाच्या शिवलिंगावर भक्तांनी जलाभिषेक, दुग्धाभिषेक व बेल अर्पण करून मनोभावे पूजा केली.

यावेळी मंदिरात सतत हर हर महादेव, वैद्यनाथ भगवान की जय अशा गजरांनी परिसर भक्तिमय झाला होता. भागवत एकादशी निमित्त घेतलेल्या दर्शनामुळे भक्तांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. अनेकांनी महादेवाची कृपा सदैव राहो अशी प्रार्थना करत आपल्या कुटुंबाच्या सुख–समृद्धीसाठी भगवान वैद्यनाथ चरणी नतमस्तक होऊन प्रार्थना केली.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणाची पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार



बीड (प्रतिनिधी)– मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सुनावणीला २० मार्च रोजी सुरुवात झाली असून आज या प्रकरणातील दुसरी सुनावणी कोर्टात पार पडली. यावेळी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी हत्या प्रकरणात सुरुवातपासून नेमकं काय घडलं आणि कोणत्या आरोपीचा काय रोल आहे, याची माहिती कोर्टासमोर मांडली. पवनचक्की कंपनीला मागण्यात आलेली खंडणी आणि नंतर झालेली सरपंच संतोष देशमुख यांची हत्या या दोन घटनांचा कसा संबंध आहे, हेदेखील निकम यांनी माहिती देताना सांगितलं आहे. सुरक्षेच्या कारणास्तव वाल्मीक कराडसह सर्व आरोपींना व्हीसीद्वारे कोर्टात हजर करण्यात आलं होतं. याप्रकरणी पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार आहे.

कोर्टासमोर युक्तीवाद करताना उज्ज्वल निकम यांनी म्हटलं की, २९ नोव्हेंबर रोजी खंडणीबाबत महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. खंडणीसाठी विष्णू चाटेच्या कार्यालयात जी बैठक झाली त्या बैठकीला सर्व आरोपी हजर होते. वाल्मीक कराड याने जगमित्र या त्याच्या कार्यालयात पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे खंडणी मागितली. त्यानंतर जेव्हा सरपंच संतोष देशमुख यांनी खंडणीला विरोध केला तेव्हा सुदर्शन घुले याने पवनचक्की कंपनीच्या वॉचमनला मारहाण केली. या मारहाणीनंतर तिरंगा हॉटेल इथं झालेल्या बैठकीत 'संतोष देशमुखला कायमचा धडा शिकवा' असं विष्णू चाटे याने सुदर्शन घुलेला सांगितलं. या संपूर्ण प्रकरणात वाल्मीक कराडने आरोपींना गाइड केलं, असा दावा निकम यांनी कोर्टात केला आहे.दरम्यान, आता हे प्रकरण आरोप निश्चितीसाठी तयार असल्याचं उज्ज्वल निकम म्हणाले. मात्र कागदपत्रे न मिळाल्याने आरोप निश्चित करण्यात येऊ नये, अशी विनंती आरोपींच्या वकिलांनी केली आहे.

# महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन

## जयभिम महोत्सव:विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ मार्च**

भारतीय संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीकडून गेल्या १५ वर्षापासून जयभिम महोत्सव साजरा केला जातो आहे. त्या अनुषंगाने यंदाही महापुरुष सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त इयत्ता ८ वी ते १२ वी मराठी, इंग्रजी माध्यम जिल्हास्तरीय 'महापुरुष सामान्य ज्ञान' स्पर्धा आयोजित केली आहे. त्या स्पर्धेत एकूण १०० गुणांचे ५० प्रश्न असणार आहेत. सदरील स्पर्धा येत्या (दि.३१) मार्च रोजी सकाळी ठीक ११ ते १२ वेळेत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. तालुक्यातील टॉप १० विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालय, आदर्श नगर, बीड. या ठिकाणी (दि.६) एप्रिल रोजी ११ ते १२ वाजता होणार आहे. त्याच दिवशी बक्षीस वितरण केले जाणार आहे.

या महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेत शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे.असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे. दरम्यान विद्यार्थ्यांनी (दि.२९) मार्चपर्यंत नाव नोंदणी करावी, नाव नोंदणी करण्यासाठी स्पर्धा समिती प्रमुख प्रा.अशोक गायकवाड, ९७६६९०३९०, भारत मगर-९३७३६३६८६३, प्राचार्य प्रदिप गाडे ९४२२७४४३००, सुमित जोगदंड ९४२२३३२२९५,प्रा.राम गायकवाड ९४२३२०३१९९, एड. राजेश शिंदे ९७६५५०४७४०, महादेव इनकर ९४२०१७११७७ यांच्या या मोबाईलवर संपर्क साधावा.असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

# डॉ.अशोक थोरात यांचे निलंबन तात्काळ मागे घ्या...




बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांचे निलंबन तात्काळ मागे घेण्यात यावे यासाठी सर्व सामाजिक व राजकीय संघटनेच्या वतीने बुधवारी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. (छाया-कृष्णा शिंदे)

# बीड-मुंबई रेल्वे सुरू करण्यासाठी खा.सोनवणेंनी ठेवला रेल्वे बोर्डाकडे प्रस्ताव

**रेल्वे मंत्री व बोर्डाचे चेअरमन यांची नवी दिल्लीत भेट**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ मार्च**



बीड ते अहिल्यानगर या रेल्वे मार्गावर रेल्वे सुरक्षा चाचणी झाली असून या मार्गावर प्रतितास ११० किलोमीटर इतक्या वेगाने रेल्वे नेण्यासाठी रेल्वे सेफ्टी बोर्डाने संमती दिली आहे. यामुळे आता बीड-अहिल्यानगर-मुंबई अशी रेल्वे सुरू करावी, असा लोकाभिमुख प्रस्ताव खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे मंत्री श्री. अश्विनी वैष्णव तसेच रेल्वे बोर्डचे चेअरमन सतिषकुमार यांच्याकडे दि.२६ रोजी मांडला.

नवी दिल्ली येथील संसद कार्यालयामधे रेल्वेमंत्री तसेच रेलभवन येथे रेल्वे बोर्डचे चेअरमन यांची खा.बजरंग सोनवणे यांनी भेट घेतली. बीडकरांसाठी महत्त्वाच्या मागणीमधे पुणे आणि मुंबई येथे जाण्यासाठी सोय उपलब्ध होणे ही महत्वाची मागणी आहे.बीड ते अहिल्यानगर प्रवासासाठी साधारणत: दोन तास लागतात. ज्यामध्ये अंमळनेर, आष्टी असे दोन थांबे प्रस्तावित करता येतील. ही रेल्वे दोन तासांमध्ये अहिल्यानगर स्टेशनवर पोहोचू शकेल. रात्री शिर्डी दादर एक्सप्रेस तेथून जाते ती अहिल्यानगर दौंड पुणे लोणावळा कर्जत कल्याण ठाणे दादर अशी प्रवास करते. एक १० डब्यांची रेल्वे बीड ते मुंबई किंवा बीड ते दादर अशी सोडता येऊ शकते. सकाळी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला ही रेल्वे पोहोचण्यासाठी त्या मार्गावर कोणताही अडथळा येणार नाही. तसेच बीड येथून फक्त दहा कोच यामध्ये दोन अनारक्षित दोन वातानुकूलित आणि सहा बिगर वातानुकूलित शायिका अशा जर नियोजित केल्या तर हे दहा डबे शिर्डी दादर एक्सप्रेसला जोडता येतील, त्यामुळे बीड ते पुणे व बीड ते मुंबई असे दळणवळण होऊ शकेल. प्रस्तावाला रेल्वेच्या स्तरावर काहीही अडथळा येणार नाही. त्यांची वाहतूक वाढेल व भारमान सुद्धा चांगले मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच बीड-आहिल्यानगर-पुणे अशी इंटरसिटी नियमीत रेल सुरु करता येईल, असा प्रस्ताव मांडला. यावेळी चेअरमन सतिषकुमार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे.

### बार्शी नाका स्थानकाचाही मांडला मुद्दा

अहिल्यानगर-बीड अशी रेल्वेची चाचणी झाली असून पालवन परिसरात रेल्वेस्टेशन करण्यात आलेले आहे. शहर व परिसरातील नागरिकांनी बार्शी नाका येथे एक अतिरिक्त रेल्वे स्थानक करुन तेथे थांबा देण्याची मागणी केलेली आहे. त्यानूसार बार्शी नाका येथील स्थानकही पुर्ण करून कार्यान्वीत करावे, असा मुद्दाही खा.बजरंग सोनवणे यांनी आवर्जुन मांडला.

# सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात माँ कर्मा देवी यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ मार्च**




येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.अरुण भस्मे यांच्या मार्गदर्शनाखाली माँ कर्मा देवी यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्राचार्य डॉ.गणेश पांगारकर, डॉ.राजू घुगे, डॉ.विवेक दुसाने, डॉ.नासेर शेख, डॉ.अनिस अहेमद, सौ. संध्या गौशाल, एकनाथ टेपाळे, तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य महेंद्र गोशाल यावेळी बोलतांना म्हणाले की, प्रत्येक संत हे जनकल्याणासाठी कार्य करत असतात त्याच प्रकारे माँ कर्मा देवी यांनी देखील कार्य केले आहे. म्हणून शेकडो वर्षानंतर देखील आपण त्यांची जयंती साजरी करत आहोत. माँ कर्मा देवी या भगवान जगन्नाथच्या भक्त होत्या असे देखील त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश थोरात यांनी केले.

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती सम्राट अशोक नगरची कार्यकारणी जाहीर

**अध्यक्ष पदी सन्नी प्रधान तर उपाध्यक्ष पदी रोहीत साळवे यांची सर्वानुमते निवड**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२६ मार्च**



भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे वेध सर्वत्र लागलेले असुन अवघं जग या प्रज्ञासुर्याला अभिवादन करण्यासाठी आतुर झालेलं असतं. गेली अनेक दशकापासून सम्राट अशोक नगर माजलगाव येथे भीम जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते,यंदाच्या वर्षी जयंती साजरी करण्यासाठी नगरातील मान्यवरांच्या उपस्थितीत बैठक घेऊन कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून भीम जन्मोत्सव २०२५ सम्राट अशोक नगर माजलगाव जयंती समितीच्या अध्यक्षपदी सन्नी प्रधान उपाध्यक्ष पदी रोहीत साळवे तर सचिव पदी राहूल भद्रे , यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

कार्याध्यक्षपदी अमर साळवे , सहसचिव सिद्धार्थ खिल्लारे , कोषाध्यक्ष विशाल पायके , विजय शेरकर . संघटक – आनंद शिंदे , विकास शरनांगत . मार्गदर्शक – सचिन जावळे , रवी राऊत , अभिषेक चौरे यांची निवड करण्यात आली असून या बैठकीच्या अध्यक्षस्थानी श्री चांदमारे सर होते प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया जिल्हाध्यक्ष विजय साळवे , रिपाई तालुकाध्यक्ष अविनाश जावळे , श्री. यु .के. जोगदंड सर , पिआरपी तालुकाध्यक्ष राकेश साळवे , सिद्धार्थ ससाणे , वंचित बहुजन आघाडीचे भारत तांगडे , मातंग समाजाचे युवा नेते अमोल शेरकर , ड. नंदकिशोर खळगे आदि मान्यवरांनी आदर्श जयंती साजरी करण्यात यावी यासाठी मार्गदर्शन केले असता या बैठकीस जेष्ठ नागरिकांसह युवा भीमसैनिक उपस्थित होते.

# सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय येथे शुक्रवारी विश्वस्त कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ मार्च**

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड आणि जिल्हा धर्मादाय वकील संघ बीडच्या संयुक्त विद्यमाने सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय बीड येथे शुक्रवारी विश्वस्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित राहणार असुन अध्यक्षस्थानी धर्मादाय उपायुक्त बीड प्रदिप चौधरी हे असणार आहेत.

महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील विश्वस्तांसाठी १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून विश्वस्तांसाठी कायद्याचे ज्ञान तसेच न्यास व संस्थेचे कार्य आणि व्यवस्थापन कायद्यानुसार होण्यासाठी तसेच न्यासाचे कार्य व विश्वस्तांचे उत्तरदायित्वाची माहिती, सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेची माहिती देण्यासाठी या विश्वस्त कार्यशाळेचे शुक्रवार दि.२८ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २ या वेळेत सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय बीड येथे आयोजन करण्यात आले आहे. उपस्थित विश्वस्तांना कार्यशाळेद्वारे संस्थेच्या व न्यासाच्या पदाधिकार्यांसह अमुल्य मार्गदर्शन देण्यासाठी या विश्वस्त कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजेश ससाणे हे राहणार असुन ते बहुमूल्य प्रमुख मार्गदर्शन आपल्या जिल्ह्याच्या विश्वस्तांना या कार्यशाळेत करणार आहेत. तरी या विश्वस्त कार्यशाळेत जिल्ह्यातील संस्था व न्यास यांच्या पदाधिकार्यांसह विश्वस्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन अॅड.उदयसिंह सालपे, सुधीर कांबळे, राम औटे, बाप्पुसाहेब जाधव, गोविंद कासट, सुग्रीव सपकाळ यांच्यासह सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड, जिल्हा धर्मादाय वकील संघ बीडच्या पदाधिकार्यांनी केले आहे.

# बीड जिल्हा जनता विकास परिषदेची जिल्हा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ मार्च**

जनता विकास परिषदेची सर्व साधारण सभा २९ मार्च रोजी शनिवारी ११.३० वाजता माजलगाव शहरातील महात्मा फुले विद्यालयाच्या पतसंस्था कार्यालयात आयोजित केली आहे. बीड जिल्ह्यातील १० तालुक्यातील पदाधिकार्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा सचिव सुमंत गायकवाड यांनी केले आहे. ही बैठक बीड जिल्हा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र आगवान हे भूषवणार आहेत.